www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 251 वा सोमवार दि. 26 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य

**जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात**



"पिण्याच्या पाण्याच्या पाइपवरच ड्रेनेजची घाण! — कोथरुड कर्वेनगर रायगड कॉलनीतील गंभीर प्रश्न प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ऐरणीवर"

**संतोष लांडे,**
पुणे जिल्हा प्रतिनिधी,
दैनिक युवक आधार

# महाराष्ट्राला तिसरा उपमुख्यमंत्री मिळणार ?

## महाराष्ट्रातील सर्वात पावरफुल नेत्याचे नाव पुन्हा चर्चेत



महाराष्ट्राच्या राजकारणत खळबळजनक ट्विस्ट येणार आहे. राज्यात सध्या अजित पवार आणि एकनाथ शिंदे असे दोन उप मुख्यमंत्री आहेत. अशातच आता महाराष्ट्राला तिसरा उपमुख्यमंत्री मिळणार आहे. महाराष्ट्रातील सर्वात पावरफुल नेत्याचे नाव उपमुख्यमंत्री पदासाठी चर्चेत आले आहे. नाशिकच्या पालकमंत्रिपदासंदर्भात बोलताना गिरीश महाजन यांनी एक मोठं विधान केले आहे. पालकमंत्रीच काय फडणवीस शिंदे, अजित पवारांनंतर तिसरा उपमुख्यमंत्री देखील करू शकतात असं वक्तव्य गिरीश महाजन यांनी केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर महाराष्ट्राला तिसरा उपमुख्यमंत्री मिळणार असल्याची चर्चा रंगली आहे. दरम्यान त्यांच्या या वक्तव्यानंतर संजय राऊतांनी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला टोला लगावला आहे. भाजप आमदार आणि मंत्री गिरीश महाजन यांनी केलेलं एक विधान केले आहे. त्यांच हे विधान चांगलंच चर्चेत आहे. देवेंद्र फडणवीसांनी ठरवलं तर ते भुजबळांना तिसरे उपमुख्यमंत्री देखील करू शकतात असं विधान गिरीश महाजन यांनी केले आहे. दरम्यान यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊतांनी भाजपवर टीकास्त्र डागलंय. भाजप गद्दारांसाठी घटना दुरुस्ती करून अनेक मुख्यमंत्री देखील करू शकतं असा टोला संजय राऊतांनी लगावला. नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तोडगा कधी निघणार असा प्रश्न सर्वांनाचा पडलाय. रायगडनंतर आता नाशिकच्या पालकमंत्रिपदाची चर्चा देखील जोर धरू लागलीय.. भुजबळांच्या एन्ट्रीनंतर त्यांच्याकडे नाशिकच्या पालकमंत्रिपद जाणार अशी चर्चा सुरु आहे. मात्र, पालकमंत्रिपदावर मुख्यमंत्रीच निर्णय घेणार असं संजय शिरसाट यांनी म्हटल आहे. पालकमंत्री कोण होणार याचा निर्णय मुख्यमंत्रीच घेणार. नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी राजकीय वर्तुळात भुजबळांच्या नावाची चर्चा सुरूय. मात्र, दुसरीकडे पालकमंत्रिपदाच्या रेसमध्ये नसल्याचं स्वतः भुजबळांनी म्हटलंय.. झी 24 तासच्या टू द पॉईंट
या कार्यक्रमात भुजबळांनी हे विधान केलंय. पालकमंत्रिपदाचा मी दावेदार नाही, जो होईल त्याला सरकार्य करणार. नाशिकच्या पालकमंत्रिपदावर विचारलेल्या प्रश्नानंतर गिरीश महाजन यांनी केलेलं विधान चांगलंच चर्चेत आहे. त्यामुळे नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून गिरीश महाजन देखील नाराज आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. तसंच नाशिक, रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा कधी सुटणार, याकडे देखील आता लक्ष लागल आहे.

## सिल्लोड येथे यश टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांनी प्रवाशांना अधिकाधिक सेवा प्रदान करण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादन आमदार अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड येथे व्यक्त केले. सिल्लोड येथे नव्याने सुरू झालेल्या यश टूर्स अँड ट्रॅव्हल्स चे उदघाटन आ.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधत असतांना आ. अब्दुल सत्तार बोलत होते.याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, शिवसेना शहरप्रमुख मनोज झंवर, आशिष कटारिया, शेख मोईज यांच्यासह सलीम शहा, तनजीम खान, शेख शमीम आदींची उपस्थिती होती.





दैनिक युवक आधार :- पाटोदा येथील पठाण इन्नुस भाई यांच्या मुलाचा शादी (विवाह) अहिल्यानगर जिल्ह्यातील घोडेगाव तालुका नेवासा येथे संपन्न झाला. या प्रसंगी उपस्थित राहुन शुभेच्छा देताना. पाटोदा नगर पंचायतचे माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, माजी सभापती तथा नगरसेवक श्रीहरी गीते पाटील, निवृत्ती सांगळे, आसीफ शेख, रामकृष्ण थोरात, वर पिता पठाण इन्नुस भाई, नितीन आडागळे सह इतर

**(छाया- शेख महेशर ताहेर )**

## कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या रायगड जिल्हाध्यक्ष पदी धम्मशील सावंत

दैनिक युवक आधार
नागोठणे वार्ताहर



पेण तालुक्यातील बेणसे येथील पत्रकार धम्मशील सावंत यांची कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या रायगड जिल्हाध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली आहे.

भीमा कोरेगाव विजयस्तंभ विकासासाठी सरकार अनेक वेळा निधीची घोषणा करीत असले तरी भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने कसलाही विकास करता येणार नाही म्हणून प्रथम न्यायालयाचा खटला जिंकणे ही आपली सर्वांची पहिली आणि सामुहिक जबाबदारी आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हा प्रशासकीय व न्यायालयीन लढा प्रत्येक गावात, शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात व राष्ट्रीय पातळीवर जनजागृती करण्यासाठी व हा लढा समाजभिमुख व्हावा म्हणून जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. न्यायालयाचा खटला गतिमान व्हावा आणि लवकरात लवकर निकाल लागावा म्हणून या लढ्यात सर्वांनी सहभागी व्हावे. यासाठी कोरेगाव भीमा विजयस्तंभ बचाव समिती स्थापन करण्यात आलेली असून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या रायगड जिल्हा अध्यक्ष पदी पत्रकार धम्मशील सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सावंत हे मागील अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत सक्रिय कार्यकर्ते तसेच विविध वृत्तपत्राचे पत्रकार असून एका मोठ्या टीव्ही चॅनलचे पत्रकार आहेत. त्यांनी अनेक विषय निर्भीडपणे समाजासमोर मांडले तर अनेकांना पत्रकारितेतून न्याय दिला आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढ्यात ते मागील काही वर्षांपासून सहभागी आहेत. या ऐतिहासिक न्यायालय लढ्यात सावंत जनजागृतीचे काम तन, मन आणि आपले सर्वस्व लावून करतील अशी अपेक्षा व्यक्त करीत पुढील कार्यास दादाभाऊ अभंग व सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पनवेल महानगरपालिका विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील

### यांच्यातत्परतेने पेंधर येथील मोठी दुर्घटना टळली

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**



महापालिका कार्यक्षेत्रातील खारघर विभागातील पेंधर गावामध्ये दिनांक 21 मे रोजी रात्री मुख्य रस्त्यावर महावितरण कंपनीची विद्युत वाहिनीचा प्रवाह सुरू असलेला कंडक्टर रस्त्यावर तुटून पडला होता. त्याचवेळी मनपा विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील काही कौटुंबिक कार्यक्रमासाठी त्याच भागात गेले असता त्यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांना संभाव्य दुर्घटनेची भीषणता लक्षात येताच त्यांनी तत्परतेने पालिकेच्या विद्युत विभागातील पर्यवेक्षक रोहन भोईर यांना तातडीने बोलवून सदरच्या कंडक्टर मधून चालू असलेला विद्युत प्रवाह बंद करण्यास सांगितले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठी विद्युत दुर्घटना टळली.
या सर्व प्रकरणाबाबत महावितरण कंपनीस अवगत करुन पुढील,कार्यवाही करण्यात आली. या कार्य तत्परतेबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रीतम पाटील यांचे अभिनंदन केले.

**महावितरण विभागाने मानले आभार**

पेंधर हे गाव महावितरण कंपनीच्या नावडे विभागात येते . काल दिनांक २१मे रोजी रात्री पावसात विद्युत वाहिनीचा कन्डक्टर तुटून पडला, ही बाब विद्युत विभाग प्रमुख प्रितम पाटील यांच्या निदर्शनास आली. श्री. पाटील यांनी प्रसंगावधान राखून मनपाच्या विद्युत कर्मचाऱ्यांना सुचना देऊन विद्युत वाहिनीचा वीजपुरवठा खंडित करणेबाबत तत्पर कार्यवाही केली.तसेच महावितरण कंपनीकडे संपर्क साधला.परिणामी विद्युत अपघातामुळे होणारी जीवितहानी टळली आहे. महावितरण कंपनीने याबाबत मनपाचे तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## उत्तरप्रदेशातील नोएडातून आणखी दोघांना अटक; हत्येतील आरोपींची संख्या पाचवर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ):**

उलव्यात राहणाऱ्या एका विवाहितेचा अज्ञाताने भररस्त्यात गळा चिरुन हत्या के ल्याची खळबळजनक घटना उलवे सेक्टर-५ मध्ये दि.१८ मे २०२५ रोजी घडली होती. या हत्येच्या गुन्ह्याची उकल करत नवी मुंबई गुन्हेशाखेच्या पोलिसांनी मृत महिलेच्या पतीसह तिघा जणांना काही दिवसांपूर्वी बेड्या ठोकल्या असतांनाच आता या हत्या प्रकरणातील दोघा आरोपींना नवी मुंबई गुन्हेशाखा युनिट-२ आणि उलवे पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने उत्तरप्रदेशातील नोएडा येथून बेड्या ठोकल्या आहेत. पोलीस उपनिरीक्षक अभय शिंदे आणि सहायक पोलीस निरीक्षक पिलाणे यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पथकाने ही कामगिरी पार पाडली आहे. सुखबीर निर्मल सिंग राठिया (२४) व गुरप्रीत अवतार सिंग, (२५) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. सदर आरोपींना नोएडा गौतम नगर येथील मा. न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने दोघांना तीन दिवसांचा ट्रान्झिट रिमांड मंजूर केला आहे. सदर अटकेतील आरोपीनंतर या हत्याकांडातील अट के तील आरोपींची संख्या आता पाचवर पोहचली आहे. याबाबत हकीकत अशी की, दि.१८ मे २०२५ रोजी उलवा पोलीस स्टेशन हद्दीत अलविना किशोर खंगार सिंग, नावाच्या २७वर्षीय महिलेची अज्ञात इसमाने गळा कापुन हत्या करण्याची घटना घडली होती. याबाबत महिलेचा पती किशोर सिंग याने उलवा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात मारेकऱ्याविरोधात कलम १०३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्हयाच्या घटनास्थळी आरोपींबाबत काहीएक सुगावा तसेच घटना पाहणारे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार उपलब्ध नसतांना यातील फिर्यादी व मृत महिलेशी संबंधित इसमांकडे गुन्हेशाखेच्या पोलिसांनी कौशल्यपुर्ण चौकशी करुन व गुन्हयाचा तांत्रिक पध्दतीने तपास केला असता, महिलेचा पती किशोर सिंग याने ६ लाख रूपयांची सुपारी देवून पत्नीची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यानंतर पोलिसांनी मृत महिलेचा पती किशोर सिंग याच्यासह त्याच्याकडून सुपारी घेवून हत्या करणारे अलिशा धनप्रकाश त्यागी व चरणजित फतेसिंह कौर उर्फ डिंपल अशा तिघांना अटक केली होती. मात्र या हत्येत सहभाग असलेले सुखबीर निर्मल सिंग राठिया, (२४) व गुरप्रीत अवतार सिंग, (२५) हे फरार होते.दरम्यान, नवी मुंबई गुन्हे युनिट २ आणि उलवे पोलीस ठाण्याचे संयुक्त पथक उपरोक्त दोघांच्या मागावर असतांनाच, दोघेही आरोपी उत्तर प्रदेशातील नोएडा येथे लपून बसले असल्याची माहिती पथकांना मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक अभय शिंदे आणि सहायक पोलीस निरीक्षक पिलाणे यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पथकाने उत्तर प्रदेश पोलिसांच्या नोएडा एसटीएफच्या मदतीने उपरोक्त दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

## एच टी बीटी प्रतिबंधित बोगस बियाणे जप्त

### तालुक्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई

**दैनिक युवक आधार**

**राळेगाव प्रतिनिधी** तालुक्यातील अंतरगाव येथील कैलास डोमाजी चंदनखेडे यांच्या घरी एचटीबीटी प्रतिबंधित कापूस वानाचे बोगस बियाणे आढळून आले असून शनिवारी (ता. २४) २ कृषी अधिकारी पंचायत समिती राळेगाव यांना गोपनीय माहिती मिळाली असता चंदनखेडे यांच्या घरी धाड टाकून एचटीबीटीची ४८ पाकिटे किंमत ४३ हजार २४८ किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. ही कार्यवाही पंचायत समितीच्या कृषी अधिकारी मनीषा पाटील यांनी केले असून या कार्यवाहीत आर कॉटन बीजी फोर पॉकीट हायब्रीड सीड्स २१ पाकीट आर कॉटन ७०२ फोरजी पाकीट हायब्रीड कॉटन २७ पॉकीट असे एकुण ४८ पॉकीट चंदनखेडे यांच्या घरी आढळून आले असून यांच्यावर बियाणे अधिनियम 1966 कलम 6,7 नुसार विनापरवाना बियाणे साठवणूक विक्री करणे कायद्याने गुन्हा असल्याने कैलास चंदनखेडे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कार्यवाही एपीआय राणे करीत आहे



## क 26 मे पासून कामगार नेते संतोष पवार व रामदास पगारे यांचे अमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायत कामगार कर्मचारी यांच्या प्रदीर्घ काळापासून प्रलंबित मागण्यांवर राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा.ना.एकनाथ जी शिंदे यांनी तत्कालीन राज्याचे मुख्य सचिव मनूकूमार श्रीवास्तव , वीत्त सचिव मनोज गुप्ता, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव श्री सुमंत भांगे, नगरविकास विभाग प्रधान सचिव सोनिया सेठी, आयुक्त तथा संचालक डॉ किरण कुलकर्णी असे उच्च पदस्थ आधिकार्यांच्या उपस्थित दिनांक 20/3/2023रोजी विधान भवन येथे सकारात्मक निर्णय घेण्यात आले. परंतू गेले २ वर्षे होऊनही या सकारात्मक निर्णयाची अमलबजावणी न झाल्याने विविध कामगार संघटनांनी सातत्याने या बाबत सतत पाठपुरावा आमलबजावणी करिता धरणे, मोर्चे , लॉग मार्च असे विविध प्रकारे आंदोलने करण्यात आली त्या - त्या वेळी इतिवृत्त तयार करण्यात आले परंतू अपेक्षित आमलबजावणी झालीच नाही.



यामुळे या प्रदिर्घ काळापासून प्रलंबित मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि प्रलंबित प्रश्न सोडवून घेण्यासाठी तसेच नगरविकास विभाग आणि वीत्त विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मनातील नकारात्मक भूमिकेमुळे कामगार कर्मचारी, निवृत्त कर्मचाऱी वर्गाचे मोठ्या प्रमाणात होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी त्याच प्रमाणे राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायती मधील हजारो कामगारांची अस्मिता जपण्यासाठी राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत कामगार कर्मचारी संघर्ष समितीचे मुख्य संघटक कामगार संतोष पवार उरण नगर परिषद व उत्तर महाराष्ट्र नगर परिषद कामगार संघटनेचे जनरल सेक्रेटरी रामदास पगारे.मनमाड नगर परिषद यांच्यावरील व ईतर कामगार प्रतिनिधीवर रोषापोटी, आकस व सुडबुद्धीने हेतुपुरस्सर केलेली कारवाई त्वरित मागे घेण्यात यावी म्हणून दिनांक 26 मे2025 रोजी महाराष्ट्र राज्य संघर्ष समितीचे नेते डॉ. डी.एल. कराड, ॲड. सुरेश ठाकूर, रामगोपाल मिश्रा, रामेश्वर वाघमारे, ॲड. सुनील वाळूंजकर, अनिल जाधव, अनिल पवार, आण्णा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदान मुंबई येथे कामगारनेते संतोष पवार उरण व रामदास पगारे.मनमाड हे अमरण उपोषणास बसणार आहेत.

# विजेचा लपंडाव सुरू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रुप ग्रामपंचायत मालडुंगा हद्दीमध्ये विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असून होणाऱ्या समस्येच्या संदर्भात आदिवासी ठाकूर समाज संघटना व ग्रामपंचायतचे सरपंच यांनी महावितरण विद्युत कार्यालय पनवेल -भिंगारी येथे भेट देऊन वारंवार होणाऱ्या विद्युत पुरवठ्याच्या संदर्भात वरिष्ठांकडे सकारात्मक चर्चा करून विजेच्या संदर्भामध्ये होणाऱ्या समस्या सकारात्मक पद्धतीने सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. या प्रसंगी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते धर्मा वाघ ( आदिवासी ठाकूर समाज संघटना -पनवेल अध्यक्ष), सिताराम चौधरी( सरपंच- ग्रामपंचायत मालडुंगे ), चंद्रकांत सांबरी, जनार्दन निरगुडा, पद्माकर चौधरी, अर्जुन घुटे यांच्यासह पनवेल विद्युत पुरवठा शाखेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पाऊस आणि वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी




विजेचे खांब कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत तर झाडे देखील तूटली आहेत. त्यामुळे वीज पुरवठा खंडित होतो आणि नागरिकांना विजेविना राहावे लागते. ग्रामीण भागातील विजेचा फॉल्ट शोधण्यात बराच वेळ जातो त्यामुळे बहुतांशी वेळ वीज पुरवठा खंडित होत आहे. महावितरणने याकडे लक्ष देऊन विद्युत पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी नागरिक करत आहेत

# "जीवन – ऋणानुबंधांची एक अलिखित कविता"

आसाराम विरकर

जीव जन्माला येतो, पण तो कुठून येतो, का येतो, आणि शेवटी कुठे जातो – हे अजूनही गूढ आहे. जेव्हा एखादा जीव माणूस म्हणून या पृथ्वीतलावर अवतरतो, तेव्हा त्याला काहीच माहीत नसतं. तो असतो एक निरागस अस्तित्व. त्याचं जात, धर्म, नाव, नाती – ही सगळी ओळख त्याला हळूहळू सांगितली जाते, शिकवली जाते. पण खरंतर या सर्व ओळखींपलीकडे काहीतरी खोल, अनामिक गाठी बांधलेल्या असतात – त्या असतात ऋणानुबंधाच्या गाठी. काही माणसं आपल्या आयुष्यात यावीतच यासाठी आपला जन्मच होत असावा, असं वाटावं, अशी त्यांची ओळख होते. कधी अचानक कुठल्या तरी वळणावर ती व्यक्ती भेटते आणि आपल्या मनाच्या आत खोलवर जाऊन बसते.

काही ओळखी जन्मजात असतात, पण काही केवळ एका क्षणासाठी. त्या क्षणांतली ओळखही इतकी हृदयस्पर्शी असते की, ती कायमची आठवण बनून राहते. काहीजण आयुष्यभर साथ देतात, आणि काहीजण फक्त थोड्या वेळासाठी येतात – पण त्यांच्या भेटीत काही तरी अपरिमित असतं, जणू काही जुनं ऋण फिटवण्यासाठीच त्या गाठी पुन्हा बांधल्या जातात. हे जग सुंदर आहे – केवळ निसर्गामुळे नव्हे, तर अशा भावनांनी गुंफलेल्या भेटीमुळे. कुणाच्यातरी डोळ्यांत साठलेली तळमळ, कुणाच्या हास्यामागचं लपलेलं दुःख, कुणाच्या स्पर्शातली ओळखीची ऊब – या सगळ्यांतूनच आपल्याला जाणवतं की, आपली एकमेकांशी काहीतरी सांगड आहे. संत तुकारामांनी म्हटलं – "विश्वाचि माझे घर", आणि संत ज्ञानेश्वरांनी पसायदान मागितलं – सर्व जीवांच्या कल्याणासाठी. ह्या संतांच्या विचारांतही ऋणानुबंधांचा गूढ सुगंध आहे – जिथे आपण केवळ स्वतःसाठी नाही, तर सर्वांसाठी काहीतरी करून जातो. आपल्या आयुष्यात अनेक माणसं येतात – काही आपले होतात, काही फक्त आठवण बनून राहतात. काही क्षण असे असतात जे आपल्याला आयुष्यभर पोसतात. कधी आपण नात्यात गुंततो, कधी मैत्रीत हरवतो. कधी कुणाशी नातं जोडताना वाटतं – हे तर आधी कुठेतरी झालेलं आहे. तेच ऋणानुबंध असतात – पूर्वजन्मीचे, अनामिक. या ऋणानुबंधांमध्ये गुंतलेलं हे आयुष्य क्षणभंगुर असलं, तरी अमूल्य असतं. प्रत्येक भेट, प्रत्येक संवाद, प्रत्येक नातं – या जगात आपण काहीतरी मागे ठेवतो, आठवणींच्या रूपानं, आणि हेच आपलं खरं अस्तित्व ठरतं. जसं एखादी कविता शब्दांमधून उमटते तसं आयुष्य ऋणानुबंधांच्या गाठींमधून जुळतं. आणि म्हणूनच, ही जीवनयात्रा – एक भावनिक, अलिखित कविता आहे.

**आसाराम विरकर ,**
**उपसंपादक दैनिक युवक आधार ,**
**मराठवाडा आवृत्ती**

# अवैधरित्या अन्नधान्य विक्री

## पुरवठा विभाग व पनवेल तालुका पोलिसांची कारवाई

## शासकीय पुरवठा विभागाचे धान्य घरामध्ये

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ):** पनवेल तालुक्यातील नेरेपाडा येथील एका घरामध्ये फोर्टीफाईड दाणे समाविष्ट असणारे सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वाटप होणाऱ्या तांदळाची व गव्हाची विक्री करण्यासाठी साठा केल्याचे आढळून आल्याने तहसीलदार पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलिस व पुरवठा विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिरुध्द गिजे यांना मिळालेल्या माहितीनुसार पनवेल तालुका हद्दीतील नेरेपाडा गावात राहणारे चंद्रहास कडू यांच्या कडे अधिकृत परवाना नसताना ते राहत असलेल्या घरी अवैधरित्या अन्नधान्य विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गिजे यांनी ही माहिती पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तहसीलदार यांना कळविली. पनवेल तहसीलदार व अप्पर तहसीलदार यांनी पनवेल पुरवठा विभागामधील पुरवठा निरीक्षक शिरीष शितोळे यांना कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार शितोळे यांनी मंडळ अधिकारी नेरे यांनाही या कारवाईसाठी सोबत घेतले.

४२ धान्याच्या गोणी केल्या जप्त

या कारवाईमध्ये ४२ गोणी जप्त करण्यात आल्या असून त्या गोदामपाल, पनवेल शासकीय गोडावून पनवेलमध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या. यावेळी कडू यांच्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील वाटप होणारा साठा केल्याचे आढळून आल्याने अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ अन्वये कारवाई केल्याची माहिती पनवेल शहर पोलिस ठाण्यात पुरवठा विभागाचे पुरवठा निरीक्षक शिरीष नंदकुमार शितोळे यांनी दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली आहे. काही गोण्यांवर शासकीय पुरवठा विभागाचे स्टीकरत्यानुसार मंडळ अधिकारी नेरे एस.एस. पाटील यांनी कडू यांच्या घरामध्ये चौकशी केली असता घरामध्ये विनापरवाना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप होणाऱ्या तांदळाची व गव्हाची विक्री करण्यासाठी आणलेला साठा केले असल्याचे आढळून आले. तांदळाच्या गोणी मधील एफ. आर. के. तांदळाचे केरनेल आढळून आले. त्याचबरोबर काही गोण्यांवर लावण्यात आलेले स्टीकर हे शासकीय पुरवठा विभाग (भारतीय खाद्य निगम) यांचे असल्याचे तपासादरम्यान आढळून आले.

# मोहन दहीकर यांनी सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला..!

## पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल नेहमीच प्रयत्नशील राहिले, अग्रवाल यांची पुण्याला बदली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**



सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांची पुणे पोलीस अधीक्षक गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे बदली झाली असून त्यांच्या रिक्त जागेवर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून पोलीस उपआयुक्त ठाणे शहरांचे मोहन दहीकर रुजू झाले असून त्यांनी शनिवारी मावळते पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांच्याकडून सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला आहे, पोलीस अधीक्षक सौरभ आग्रवाल यांनी 21 ऑक्टोबर 2022 रोजी सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारला होता, जिल्ह्यात अग्रवाल हे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नेहमीच यशस्वी ठरले, मोहन दहीकर हे देखील एक वरिष्ठ अधिकारी त्यांनी देखील विविध जिल्ह्यात आपल्या कामाची आगळीवेगळी छाप पडली आहे, धाराशिव रत्नागिरी सिंधुदुर्ग रायगड या पोलीस अधीक्षकांच्या देखील बदल्या करण्यात आल्या, राज्यांत गुरुवारी पोलीस अधीक्षक आणि पोलीस उप आयुक्त पदांवरील जवळपास 22 अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या.



# यंदा भांडुप परिसरात पाणी साचणार नाही!

## नालेसफाई वेगाने सुरू असल्याचा पालिकेचा दावा

**मुंबई :** गेल्या वर्षी अतिवृष्टी झाल्याने रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. विशेषतः भांडुप उषानगर नाला, चुनाभट्टी, घाटकोपर, कुर्ला, विद्याविहार आदी सखल भागाच्या ठिकाणी पावसाचे पाणी साचून रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला होता. मात्र यंदा पालिकेतर्फे सदर ठिकाणी नालेसफाईची कामे जोरात सुरू आहेत. तसेच, पावसाचे पाणी साचण्यात आलेल्या अडचणी, त्रुटी या दूर करण्यात येत आहेत. अशी ग्वाही पालिका अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली असल्याची माहिती समोर आली आहे.

भांडूप येथे मध्य रेल्वेच्या ज्या ठिकाणी कल्व्हर्ट आहेत, ज्या ठिकाणी गतवर्षी अधिक पाऊस पडल्याने पाणी साचले त्या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच, यंदा पाऊस वेळेआधीच सुरू झाला असला तरीही नालेसफाई वेळेत पूर्ण होईल असेही अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे समजते. आतापर्यंत मोठ्या नाल्याची ८५ टक्के तर छोट्या नाल्यांची ६५ टक्केपर्यंत सफाई पूर्ण झाली आहे. महापालिकेने दरवर्षी पाणी साचणारी ठिकाणे निश्चित केली असून ४२२ ठिकाणी पंप लावले आहेत.

# पदविका आता चार फेऱ्यांमध्ये

## नव्या बदलाची यंदापासून होणार अंमलबजावणी

**मुंबई :** अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, वास्तुकला पदविका आणि बारावीनंतर हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका आणि औषधनिर्माणशास्त्र पदविका (डिप्लोमा इन फार्मसी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आता तीनऐवजी चार प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या नव्या नियमाची अंमलबजावणी होणार आहे. या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना आता चौथ्या फेरीनंतर चांगला पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध होणार नाही.


अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका हे अभ्यासक्रम येतात. तर प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. वास्तुकला पदविका अभ्यासक्रम हा वास्तुकला परिषदेच्या अखत्यारित येतो. त्याचप्रमाणे प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र पदविका हा अभ्यासक्रम फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या अख्यत्यारिमध्ये येतात. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये यंदा महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य तांत्रिक पदविका शैक्षणिक संस्था (प्रवेश) नियम, २०१९ या कायद्यांतर्गत घेण्यात आला आहे. त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाकडून यंदा राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये हा महत्त्वपूर्ण बदल करण्यात येणार आहे.

पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत तीन फेऱ्या राबवण्यात येत होत्या. मात्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या अभ्यासक्रमांच्या चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र असलेल्या उमेदवाराने भरलेला पर्याय अर्जामध्ये बदल करण्याची सुविधा मिळणार आहे.

मागील फेऱ्यांमध्ये पर्याय अर्ज भरण्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांना या चौथ्या फेरीमध्ये पर्याय अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. फेरी वाढविण्यात आल्या या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला मिळणार आहे.

### फेरीत करण्यात आलेले बदल

- एखाद्या उमेदवाराला दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत अनुक्रमे पहिल्या तीन आणि सहा पसंतींनुसार जागा मिळाली असेल, तर जागावाटप आपोआप गोठवण्यात येईल. स्वीकृतीनंतर उमेदवार त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र राहणार नाही. अशा उमेदवारांनी कागदपत्रांच्या पडताळणीसाठी एआरसीकडे हजर राहून कागदपत्रांची स्वतः छाननी करून ऑनलाइन पद्धतीने शुल्क भरावे. त्यानंतर जागा वाटप केलेल्या संस्थेत हजर राहून प्रवेश घ्यायचा आहे. जर उमेदवार एआरसीला हजर झाला नाही किंवा कागदपत्रांची तपासणी करण्यात अयशस्वी ठरल्यास त्याला वाटप केलेल्या जागेवरील त्याचा दावा आपोआप रद्द होऊन ती जागा पुढील प्रवेशासाठी उपलब्ध होणार आहे.



- दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत उमेदवाराला पहिल्या तीन आणि सहा पसंतीक्रमांव्यतिरिक्त जागा मिळाल्यानंतर त्यांनी मिळालेल्या जागेवर प्रवेश घेतल्यास तो पुढील फेरीत सुधारणा करण्यासाठी पात्र राहील.
- चौथ्या फेरीनंतर उमेदवाराला पुढील कोणताही सुधारणा पर्याय उपलब्ध राहणार नाही. तसेच कार्यरत व्यावसायिकांसाठी दुसऱ्या फेरीनंतर पुढील कोणताही सुधारणा पर्याय उपलब्ध नसेल.

# आरोग्य संजीवनी

संकलन, उमेश पाटील

शेवगा

शेवगा ही एक शेंग भाजी आहे. दक्षिण भारतात आढळणारी ही वनस्पती खूप औषधी देखील आहे. या शेवग्याचे फायदे आणि गुणधर्म आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

शास्त्रीय नावः मॉरिंगा ओलेफेरा

हवामान – या झाडासाठी समशीतोष्ण आणि दमट वातावरण आवश्यक असते.

उंची – साधारण उंची १० मी. असते.

प्रमुख उपयोग – शेवग्याच्या शेंगा कालवण, कढी, आमटी किंवा सुकी भाजीत शिजवून खाल्ल्या जातात. या झाडाची पाने, फुले, फळं, साल, आणि मुळे या सर्वांचा उपयोग आयुर्वेदिक औषधे आणि नैसर्गिक उपचारात केला जातो. बियांपासून तेल सुद्धा काढले जाते आणि पानांपासून आपण भाजी बनवू शकतो. शेवगा हा हाडांसाठी वरदान आहे. यामध्ये कॅल्शिअम आणि प्रथिने जास्त प्रमाणात आढळतात. तसेच कार्बोहायड्रेट, पोटॅशिअम, आयर्न, मॅग्नेशिअम, व्हिटॅमिन ए, सी आणि बी अशी भरपूर जीवनसत्त्वे शेवग्यामध्ये आढळतात. कोवळ्या पानांची भाजी महाराष्ट्रात मृग नक्षत्रात केली जाते. पावसाळ्याच्या सुरुवातीला शरीरातील वातदोष वाढलेला असतो म्हणून ही भाजी तेव्हा आवर्जून खाल्ली जाते.

शेवग्याचे आयुर्वेदिक गुणधर्म –

१. हाडे मजबूत आणि निरोगी राहण्याकरिता शेवग्याची भाजी नियमित सेवन करावी.
२. वजन जास्त वाढले असल्यास शेवग्याच्या शेंगेचे सूप बनवून प्यावे. नियमित पिल्यास चरबीचे प्रमाण कमी झालेले दिसेल. याबरोबरच नियमित व्यायाम देखील करावा.
३. शारीरिक दौर्बल्य असल्यास शेवग्याच्या शेंगा नियमित आहारात घ्याव्यात.
४. तसेच संधिवात, नेत्ररोग, स्नायूंची कमजोरी या व्याधी देखील बऱ्या होतात.
५. शेवगा हा उष्ण आहे म्हणून त्याचा वात आणि कफ या प्रकारच्या विकारांवर उत्तम उपयोग होतो.
६. शेवगा हा उत्तम पाचक आहे. पोटातील पचनक्रिया व्यवस्थित होऊन रक्तप्रवाह सुधारतो.
७. शरीरावर किंवा शरीराच्या आतील भागात आलेली सूज शेवग्याच्या सालीच्या काढ्याने कमी होते.
८. डोकेदुखी व जडपणा यावर शेवगा अत्यंत गुणकारी आहे.
९. शेवगा जंतनाशक असल्याने पोटातील कृमी विष्ठेवाटे बाहेर पडतात.
१०. रक्तदोष, मुतखडा, उच्च रक्तदाब, मधुमेह या आजारांमध्ये शेवगा गुणकारी आहे.

**सौंदर्य खुलवण्यासाठी उपयोग –**

अनेक जीवनसत्त्वांची कमतरता शेवगा भरून काढतो. जसे अन्न तसे मन आणि शरीर, या उक्तीप्रमाणे तुम्ही शेवगा नियमित सेवन करत असाल तर तुमचे सौंदर्य खुलवण्यात नक्कीच सहयोग होईल. त्वचाविकार, थकवा, आणि डोळ्यांचे विकार यामध्ये शेवगा नियमित सेवन करा. नक्कीच लाभ होईल व शारीरिक कांती उजळेल.

# खारघर, तळोजा वसाहतीत उपद्रव; कुत्र्यांचा 94 जणांना चावा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ):**
खारघर आणि तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. रस्त्यावरून पायी चालत जाणाऱ्या व्यक्तींवर मोकाट कुत्र्यांचा कळप हल्ला करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे वर्षभरात खारघर परिसरात ५४ जणांना तर तळोजा वसाहतीत ४० अशा ९४ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झाली आहे. पालिकेकडून मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण मोहीम राबवली जात असताना, खारघर-तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. खारघर आणि तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर, गल्लीत टोळक्याने फिरणाऱ्या या कुत्र्यांमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच दुचाकीवरून जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालिका प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. निर्बीजीकरणामुळे कुत्र्यांची संख्या कमी होणे आवश्यक होते; मात्र त्यात वाढ होताना दिसून येत आहे. तळोजा वसाहतीत आजही कुत्र्यांची लहान लहान पिल्ले जागोजागी दिसून येतात. शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर भटक्या कुत्र्यांची टोळी खुले आम फिरत असल्याने शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध, व्यापारी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या वर्षभरात खारघर परिसरात ५४ जणांना; तर तळोजा वसाहतीत ४० जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झाली आहे. शहरात वर्दळीच्या भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. दिवस-रात्र मोकाट कुत्री रस्त्यावर टोळीने फिरतात. अनेकदा ही कुत्री पादचारी, दुचाकी, चारचाकी वाहनांच्या मागे जोरजोरात भुंकत पळतात. कधी कधी कुत्रे अचानक दुचाकीच्या आडवे आल्याने अनेक दुचाकीस्वार पडून जखमी झाले आहेत.

कुत्र्यांना डिवचण्याचे प्रकार अनेक वेळा मुले खेळताना दगड मारून पळ काढतात. काही सायकल, दुचाकीचालक दुचाकी चालवत असताना रस्ते आणि पदपथावर वसलेल्या कुत्र्यांच्या शेपटावरून वाहन घेऊन जातात. त्यावेळी असे प्रकार होत असतात. खारघरमधील जलवायू विहार सोसायटीत ६५० सदनिका असून, या सोसायटीत जवळपास ४०हून अधिक मोकाट कुत्र्यांनी सोसायटीचा ताबा घेतला आहे. रात्री-अपरात्री होणाऱ्या कुत्र्यांच्या आवाजामुळे रहिवाशांची झोप उडाल्याची तक्रार येथील रहिवासी करीत आहेत .

# पश्चिम महाराष्ट्रामध्ये सतत अवकाळी पाऊस, शेतकरी पेरणीच्या चिंतेत!

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**



गेले पाच ते सात दिवस सलग अवकाळी पाऊस पडत आहे. सकाळी ऊन दुपारी पावसाच्या ढगाची निर्मिती व सायंकाळी चार वाजल्यापासून पाऊस हा दिनक्रम चालूच आहे मे महिन्यातच अवकाळी पावसाने सातारा सांगली कोल्हापूर जिल्ह्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पावसामुळे नदी ,नाले ,छोटे ,तलाव ओसंडून वाहू लागले आहेत. काही ठिकाणी तर तलावांना नद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये मे महिन्यात शेतकरी पावसाच्या अगोदर शेतकरी शेतीची मशागत दरवर्षी करत असतो. दरवर्षी या महिन्यात पाऊस पडल्यावर थोडा विश्रांती देतो .त्यावेळेस शेतकऱ्यांना शेतीची मशागत करण्यास वेळ भेटतो. याच कालावधीत ग्रामीण भागातील बहुतांश शेतकरी आपली पेरणी करत असतात व बाकीची पेरणी ही जून महिन्यात पाऊस चालू झाल्यानंतर होत असते पेरणी झाल्यामुळे शेतकरी समाधानी होत असतो. घाटमाथ्यावर अशाच प्रकारे पेरणी केली जाते व बागायती शेतीमध्ये पाऊस पडल्यानंतर पिकांची रोपे लावून लावणी केली जाते. यावर्षी एक वेगळी समीकरणे पावसाने बदलली आहेत.मे महिन्यात सततच्या अवकाळी पावसामुळे पावसाळ्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये पाच ते सात दिवसात दाखल होणार आहे. त्यामुळे शेतकरी पाऊस कधी उघडणार व पेरणीस कधी सुरुवात करणार याची चिंता शेतकऱ्याला वाटू लागली आहे.

# पाऊस धारा

मनसोक्त बरसतात पाऊस धारा
चिंब चिंब भिजली वसुंधरा
गुज कानी काल सांगून गेला
अवखळ,खट्याळ रान वारा....

प्राजक्ताचा गंध दाहिदिशी पसरला
पाऊसधारा येती खाली झराझरा
पृथ्वीवरती फुलांचा सडा पडला
प्राजक्तावर पडती टपोऱ्या गारा ...


पाऊसधारात चिंब चिंब वसुधा
जोवर आहे अवनीवर पावसाळा
कोकीळ गाते गीत सुमधुर
पावसात तिचा खूप गोड गळा...

तुझ्याच प्रेमाखातर सजना बर
तुझ्यासाठी माझा प्रपंच सारा
बरसतात पावसाच्या चिंब धारा
अवघळ संवेदना माझ्या अंतरा....

**वसुधा वैभव नाईक, पुणे**

# प.पू बालयोगी काशिगिरी महाराज पुण्यतिथी निमित्ताने त्रिदिनी कीर्तन सोहळा मुर्डेश्वर केळगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड:** मुर्डेश्वर संस्थांनचे पिठाधीश प.पू ब्रह्मलीन बालयोगी काशिगिरी महाराज यांच्या ०७ व्या पुण्यतिथी निमित्त मुर्डेश्वर केळगाव येथे त्रिदिनी कीर्तन उत्सव सोहळ्याचे आयोजन मुर्डेश्वर संस्थान केळगाव चे पिठाधीश प .पू ओमकारगिरी महाराज, सेवानिवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून या कीर्तन सोहळ्याचा प्रारंभ दिनांक २६ मे रोजी होणार असून सांगता २८ मे रोजी होणार आहे.दिनांक २६ मे रोजी रात्री ०८.३० ते १०.३० ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज शेलुदकर, दिनांक २७ मे रोजी समाजप्रबोधनकार ह.भ.प निवृत्ती महाराज इंदुरीकर,दिनांक २८ मे रोजी दुपारी १२. ते ०२. या वेळेत छत्रपती संभाजीनगर चे अतिरिक्त आयुक्त ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांचे काल्याचे कीर्तन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमांसाठी १००८ महामंडलेश्वर दयानंद महाराज शेलगाव,प. पू गणेशानंद सरस्वती, सचिव आनंदा आखाडा त्र्यंबकेश्वर, स्वामी अखंडानंद गिरीजी महाराज, भवानीगड बीड, महंत नामदेव महाराज पल्हाळ शिवेश्वर देवस्थान वाकी, कृष्णगिरी महाराज कायगाव,१००८ महामंडलेश्वर सुखदेव महाराज वाकी यांच्यासह संत, महंत,कीर्तनकार आदी उपस्थित राहणार आहे.माजी मंत्री आ.अब्दुल सत्तार, मा. केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, खासदार, कल्याणराव काळे, आ.अनुराधा चव्हाण, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, यांच्यासह वैद्यकीय,प्रशासकीय, राजकीय,कृषी,शैक्षणिक,धार्मिक,अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तीन दिवस नियमित काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, मुर्डेश्वर महादेवाची आरती व पूजा,अभिषेक, हरिपाठ आदी विधी देखील संपन्न होणार आहे.सदर पुण्यतिथी सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक शिव शारदा शिक्षण प्रसारक मंडळ तथा अखिल भारतीय वारकरी महासंघाचे सचिव कृष्णा लहाने, माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय अनाथालय व गोशाळा चे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर महाराज पवार, जय मुर्डेश्वर समस्त भक्त परिवार व स्थानिक भक्तमंडळी केळगाव परिसर यांच्यावतीने करण्यात आले आहे.



# अनवळे गावचा युवक अलोक वाळुंज याने मिळवली अमेरिकेतील "स्पेस युनिव्हर्सिटी"मधून एमएस पदवी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – डॉ. देवेंद्र ओव्हाळ, खेड (पुणे)**
खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील छोटेसे पण स्वाभिमानी गाव अनवळे येथील युवक अलोक सुभाष वाळुंज याने अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सुप्रसिद्ध स्पेस युनिव्हर्सिटी मधून मास्टर ऑफ सायन्स इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ही पदवी संपादन करून गावाचा तसेच पाईट परिसराचा नावलौकिक वाढवला आहे. अलोक वाळुंज याच्या कुटुंबाची सामाजिक बांधिलकी ठसठशीत असून, त्यांच्या आईने दहा वर्षे वडिलांनी पाच वर्षे ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पद भूषवले आहे. अशा कुटुंबातून आलेल्या अलोकने कठीण परिस्थितीमध्येही हार न मानता स्वतःच्या शिक्षणासाठी पार्ट टाइम नोकरी करून खर्च उचलला. त्याने स्वतःच्या मेहनतीने व जिद्दीने अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी वाटचाल केली. अमेरिकेत स्थायिक असलेल्या काही भारतीयांनी अलोकच्या प्रगतीला हातभार लावून त्याला योग्य मार्गदर्शन दिले. या सहकार्यामुळे अलोकला जागतिक स्तरावर आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करता आली आणि त्याने आपल्या परिसराचा गौरव वाढवला. या यशामुळे अनवळे ग्रामस्थांसह पाईटच्या पश्चिम भागात अलोक वाळुंज याचे मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळणार असून, ग्रामीण भागातूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# आष्टी येथे ट्रक खाली चिरडून महिलेचा मृत्यू

## आष्टी अहिल्यानगर रोड वरती हृदय द्राव घटना

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**बीड आष्टी प्रतिनिधी**

आष्टी अहिल्यानगर रोडवरील 132 केव्ही समोर आष्टी कडून अहिल्यानगर कडे जात असलेल्या माल ट्रक खाली मोटार सायकल स्वार असलेली आष्टी शहरातील करिष्मा आयास सय्यद या महिलेचा ट्रक खाली आल्यामुळे जागीच मृत्यू झाला.अपघात एवढा भीषण होता की,ट्रक खाली ती महिला जवळपास वीस फुटापर्यंत फरपटत माल ट्रकने नेली.आयास हे सय्यद बाजूला पडले.हा अपघात रविवारी सकाळी घडला.अपघात कसा झाला त्या घपघाताचा तपास आष्टी पोलीस स्टेशन करत आहे.






**दैनिक युवक आधार /प्रतिनिधी श्री विकास वायाळ -** कृपया सर्वांना विनंती आहे की लहान मुलांना पैसे न देता वस्तू रुपी खाऊ द्यावा कारण पैशासाठी लहान मुलांना किडनॅप करून भीक मागण्यास प्रवृत्त केले जाते कृपया सदर प्रवृत्तीला मूठ माती देण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती की जेणेकरून लहान लहान मुले किडनॅप केली जाणार नाही व अशा प्रवृत्ती चा नायनाट होईल



**दैनिक युवक आधार-** कामं तुमची साथ आमची
कोथरूड जनसंवाद मार्फत दर रविवारी १० ते १२ च्या दरम्यान नागरिकांचे समस्या जाणून त्या सोडवण्याचे प्रयत्न करण्यात येते.
कोथरूडकरांना हक्काचे व्यासपीठ मिळावे व आपल्या समस्या सांगण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे हा या उपक्रमातून प्रयत्न करण्यात आला आहे.
हा उपक्रम राज गोविंद जाधव
कोथरूड विधानसभा काँग्रेस कमिटी
युवक कॉंग्रेस कोथरूड विधानसभा यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे

## पोलिसांनी आणखी फोर्टिफाईड तांदूळ केला जप्त

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

दोन आठवड्यांपूर्वी फोर्टि फाईड तांदूळ जप्त केल्याप्रकरणी शिवप्रसाद सरोज आणि जय आनंद फूड इंडस्ट्रीजचे मालक लखन पटेल यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी आणखी तांदूळ जप्त करत कारवाई केली आहे. पनवेल तालुक्यातील आजीवली प्रीती सिएफएस मधून 133 टन माल जप्त करण्यात आला असून जय आनंद फूड येथून देखील 25 लाखांचा फोर्टिफाईड तांदूळ जप्त केला असल्याची माहिती पनवेल पोलिसांनी दिली. त्यानंतर कंपनी सील करण्यात आली आहे. याप्रकरणी 2 आरोपींचा शोध सुरू असून संतोष सिंग कंपनी व्यवस्थापक याला आरोपी करण्यात आले आहे. तर लखन पटेल याच्याविरोधात यापूर्वी देखील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

# पावसाळ्याचा फटका समुद्रमार्गालाही ; गेटवे ते मांडवा फेरी सेवा ३१ ऑगस्टपर्यंत बंद, रो-रो सेवा ठरली पर्याय

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पावसाळा सुरू होताच समुद्रात होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला ब्रेक लागला असून, उद्यापासून म्हणजेच २६ मेपासून गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा दरम्यानची लोकप्रिय फेरी सेवा तब्बल तीन महिन्यांसाठी बंद होणार आहे. ही सेवा थेट ३१ ऑगस्टपर्यंत थांबवण्यात आली असून, या कालावधीत प्रवाशांना रो-रो बोट सेवा आणि रस्तेमार्ग यावरच विसंबून राहावं लागणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाचे मांडवा बंदर निरीक्षक आशिष मानकर यांनी ही माहिती दिली आहे. त्यांच्या माहितीनुसार, पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून दरवर्षीप्रमाणे यंदाही खबरदारीचा उपाय म्हणून ही सेवा थांबवण्यात आली आहे. गेटवे ते मांडवा या जलमार्गावर दररोज पीएनपी, मालदार, अजिंठा आणि अपोलो या प्रमुख शिपिंग कंपन्यांच्या बोटी धावत असतात. या कंपन्यांकडे एकूण ८५ मोठ्या बोटी असून, त्याचबरोबर सुमारे ७०



छोट्या प्रवासी बोटीही प्रवाशांची वाहतूक करतात. मात्र २६ मेपासून या सगळ्यांनाच तात्पुरता ब्रेक लागणार आहे.रो-रो बोट सेवा ठरणार दिलासा दरम्यान, भाऊचा धक्का ते मांडवा या मार्गावर चालणारी 'रो-रो' सेवा मात्र सुरूच राहणार आहे. या सेवेमुळे प्रवाशांना काहीसा दिलासा मिळणार आहे. रो-रो बोट दररोज चार वेळा धावणार असून, रविवारी एक अतिरिक्त फेरी सुरू राहणार आहे. अर्थातच ही सेवा हवामानाच्या स्थितीनुसार चालू राहील की नाही हेही पाहावं लागेल. एक तास वाचवणारा समुद्रमार्ग बंद, आता चार तासांचा रस्ता प्रवास अपरिहार्य समुद्रमार्गामुळे मांडवा ते मुंबई हा प्रवास अवघ्या एका तासात शक्य होतो. मात्र आता पुढचे तीन महिने हा जलमार्ग बंद राहणार असल्याने प्रवाशांना चार तासांचा रस्ता प्रवास करावा लागणार आहे. त्यामुळे मुंबईतील पर्यटक, व्यावसायिक आणि अलिबाग, रेवदंडा, मुरूड, रायगड परिसरातील स्थानिक यांना चांगलाच फटका बसणार आहे.पर्यटनावर परिणाम अनिवार्य गेल्या वर्षभरात म्हणजे १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत जवळपास २० लाख १० हजार प्रवाशांनी या जलमार्गाचा लाभ घेतला होता. यामुळे महाराष्ट्र सागरी मंडळाला सुमारे ४.१० कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. रो-रो सेवा आणि त्यातून वाहून नेण्यात आलेल्या वाहनांमधूनही ५५.३८ लाख रुपयांची कमाई झाली होती.मांडवा किनाऱ्यावरील पर्यटन केंद्र, रिसॉर्ट्स, स्थानिक व्यावसायिक यांच्यावरही या सेवाबंदीनं परिणाम होणार आहे. समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यावर प्रेम करणाऱ्या मुंबईकरांना आता पावसाळ्यापर्यंत थांबावं लागणार आहे.सप्टेंबरपासून पुन्हा सेवा सुरू होणार गेटवे ते मांडवा ही सेवा सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत 'रो-रो' सेवा आणि रस्ते मार्गच प्रवाशांचा एकमेव पर्याय राहील.

१. "पावसाळा दरवर्षी येतो, पण फेरी सेवा बंद झाल्यानं आमचा व्यवसाय मात्र दरवर्षी ढासळतो."
– **राहुल सावंत, मांडवा येथील स्थानिक रेस्टॉरंट व्यावसायिक**

२. "समुद्रमार्ग बंद झाला की मुंबईकडून येणारे पर्यटकच नाहीसे होतात. याचा थेट परिणाम आमच्या उपजीविकेवर होतो."
**निता म्हात्रे, पर्यटन मार्गदर्शिका, अलिबाग**

३. "रो-रो सेवा सुरू राहणं हा दिलासादायक निर्णय आहे. मात्र ती सुद्धा हवामानावर अवलंबून असते, हे विसरून चालणार नाही."
**आशिष मानकर, बंदर निरीक्षक, महाराष्ट्र सागरी मंडळ**

४. "एक तासाचा प्रवास आता चार तासांचा होतोय. वेळ, पैसा आणि श्रम तिन्हींचं नुकसान होतं."
– **ऋतिका म्हात्रे, नियमित प्रवासी**

# व्हॉईस ऑफ मीडिया' देणार प्रशिक्षण पत्रकारिता आणि संघटनात्मक बांधणीवर दोन दिवसीय अभ्यासपूर्ण सत्रांचे शिर्डीत आयोजन

## राज्यभरातून सहभागी होणार व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (केतन भोज)** – राज्यातील पत्रकारांच्या व्यावसायिक क्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकार संघटनेच्या वतीने दिनांक ३१ मे व १ जून २०२५ रोजी शिर्डी येथील आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. "बदलती पत्रकारिता आणि संघटनात्मक बांधणी" या मुख्य विषयाभोवती फिरणाऱ्या या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील नामवंत संपादक, अभ्यासक आणि व्यावसायिक तज्ज्ञ आपले मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचे उद्घाटन शनिवार, ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगलीदास महाराज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, ना. राधाकृष्ण विखे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि आमदार अमोल खताळ हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.पहिल्या दिवशी दै. पुढारी, पुणेचे संपादक सुनील माळी हे "ग्रामीण पत्रकारिता" या विषयावर आपले विचार मांडतील. त्यानंतर ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे आणि चपराक, पुणेचे संपादक घनश्याम पाटील हे अनुक्रमे "बातमीदारी आणि साहित्य" व "पत्रकारितेचे बदलते स्वरूप" यावर सखोल मार्गदर्शन करतील. दुसऱ्या दिवशी व्यावसायिक मानसिकता विकास तज्ज्ञ गगन महोत्रा, वजीर मीडिया हाऊसच्या संचालिका स्मिता गुणे व अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर नवले यांच्या सत्रांमध्ये "महिला पत्रकारिता : मार्केटिंग एक उद्योग", "समाजाची पत्रकारितेकडून अपेक्षा" या विषयांवर विचारमंथन होणार आहे.या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीसाठी मोफत सर्व रोग निदान शिबीर आणि हेल्थ कार्ड देण्यात येणार आहे. याच कार्यशाळेदरम्यान आत्मा मलिक मल्टी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि व्हॉईस ऑफ मीडिया यांच्यातील सहकार्य कराराची औपचारिक घोषणा देखील करण्यात येईल.या उपक्रमात व्हॉईस ऑफ मीडियाच्या प्रदेश अध्यक्ष अनिल मस्के, कार्याध्यक्ष अजित कुंकुलोळ, सरचिटणीस डिगंबर महाले, महिला प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी आणि सविता चंद्रे (ग्रामीण) यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

# रूपाली चाकणकरांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा तात्काळ राजीनामा द्यावा

## वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणामुळे..! करूणा शर्मा यांची सरकारकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

रूपाली चाकणकरांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा तात्काळ राजीनामा **द्यावा** :- वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणामुळे..! करूणा शर्मा यांची सरकारकडे मागणी..!! रूपाली चाकणकर म्हणतात मी आत्तापर्यंत 35971 महिलांच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत, मात्र त्यातील किती महिलांना तुम्ही न्याय मिळवून दिलाय? मी देखील 6-6 तक्रारी दिल्या होत्या त्या तुम्ही पोलिसांकडे ढकलतात... तुम्ही त्याबद्दल विचारपूस करत नाही की हे प्रकरण तडीसं गेलं काय? किती महिलांना न्याय मिळाला? त्यांच्यामुळे महिलांवरील अत्याचार वाढत चालले आहेत असे म्हणत करुणा शर्मा यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा पदाचा रूपाली चाकणकारांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी करूणा शर्मा यांनी सरकारकडे केली आहे, करुणा शर्मा पुढे म्हणाल्या... महिलांच्या आत्महत्या वाढत आहेत विवाहित मुलगी घरात असताना तिचा नवरा तीन-तीन लग्न करत आहे, जर महिला आयोग काम करत असता, तर एकही मुलगी अशी बसली नसती तुम्हीच काहीच काम करत नाही रूपाली चाकणकर तुम्ही आता तात्काळ राजीनामा द्यावा:- कारण चांगले सामाजिक काम करणारी राजकीय महिला त्या ठिकाणी बसवा राजकीय महिला आयोगात नको आहे, ज्यांचे काम सभा घेणे नाही, तर महिलांना न्याय देणेही आहे महिलांसाठी भरपूर कायदे आहेत मात्र त्यांना न्याय मिळत नाही असे हे



करूणा शर्मा म्हणाल्या आहेत, अंजली दामानिया पुढे म्हणाल्या... महिला आयोग यावर काय स्पष्टीकरण देणार का? वैष्णवी चा जीव वाचला नसता का ? वैष्णवीची जाव मयुरी हिने महिला आयोगाकडे तक्रार केली होती तिला मारहाण होत आहे, तिच्या सासऱ्यांनी छातीजवळ हात लावून कपडे फाडले शिवीगाळ केली याचे पुरावे फोटो व तिच्या आईने लिहिलेली चिट्ठी पाठवलेली मी चिट्ठी सुद्धा जोडत आहे, आमचा मेव्हुणा मोठा पोलीस अधिकारी आहे, आमच्या मागे मोठा राजकीय पाठिंबा आहे, असे त्या चिठ्ठीमध्ये उल्लेख आहे महिला आयोगाने यावर कारवाई का नाही केली ? याचे उत्तर हवे आहे, वेळेच्यावेळी ही कारवाई झाली असती तर आज वैष्णवी चा सुद्धा जीव वाचला असता,

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पंजाबराव डक हवामान तज्ञ यांच्या पावसाच्या व वातावरणाच्या अंदाजा नुसार दि.२ जुन मुखेड शहरात भव्य दिव्य ऐतिहासिक स्वरूपाची मिरवणूक आणि शोभायात्रा आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -** मुखेड शहरामध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक आणि शोभायात्रेचं 26 मे 2025 जंयती आयोजित केली होती तरी पाऊस व वातावरणाच्या बदलामुळे तारिख बदल करण्यात आली तरि छत्रपती संभाजी महाराज याच्या मावळ्यांनी नोंद घ्यावी व सर्व मावळे दि 2 जुन 2025 रोजी सोमवार या रोजी आयोजन करन्यात आले आहे शिवप्रेमी बांधव या रॅली मध्ये सहभागी व्हावे हि विनंती धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पंजाबराव डक हवामान तज्ञ यांच्या पावसाच्या व वातावरणाच्या अंदाजा नुसार




दिनांक २ जुन २०२५ रोज सोमवार, मुखेड शहरात भव्य दिव्य आणि ऐतिहासिक स्वरूपाची मिरवणूक आणि शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे. या जयंती उत्सवाचे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जन्मोत्सव समिती, राजमुद्रा सामाजिक संघटना, छावा संघटना, संभाजी ब्रिगेड, साईभक्त मित्र मंडळ, डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम समिती व सर्व बहुजन बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.या मिरवणुकीची सुरुवात सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती संभाजी महाराज स्मारक, -बान्हाळी रोड मुखेड येथून होणार असून, ती मुख्य रस्त्याने शहरातून पुढे जाणार आहे.

**कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये:** भव्य पुतळा देखावा: छ.संभाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणारा आकर्षक पुतळा सजवण्यात येणार आहे. शोभायात्रा व पालखी मिरवणूक: डोलते रथ, पालखी व सजवलेली वाहने सहभागी होतील.ऐतिहासिक शिवकालीन देखावे: मर्दानी खेळ, दडपता युद्धकला सातारा सादरीकरण, पारंपरिक घोडे व उंटांची मिरवणूक, शिवकालीन वेशातील मावळे हे विशेष आकर्षण असणार आहे. भजनी मंडळ व DJ: नांदेड जिल्ह्यातील प्रसिद्ध भजनी मंडळांची सादरीकरणे व महाकाल DJ नांदेड यांचं विशेष संगीत सादरीकरण. विशाल रॅली: विविध सामाजिक संघटनांचा सहभाग असलेली भव्य रॅली देखील काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेचा उद्देश छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचे स्मरण करून देणे, तरुण पिढीला प्रेरणा देणे आणि सामाजिक एकोपा वाढवणे आहे. समाजातील सर्व नागरिकांनी सहकुटुंब या शोभायात्रेत सहभागी होऊन ऐतिहासिक परंपरेचा भाग व्हावे असे आयोगाकडून आवाहन करण्यात येत आहे.

दिनांक 26 मे 2025 ऐवजी 2 जून 2025 रोजी भव्य मिरवणुकीचे आयोजन केवळ पावसाच्या व वातावरणाच्या अंदाजामुळे बदल करण्यात आलेला आहे याची सर्व शिवप्रेमी नोंद घेऊन सहकार्य करावे याप्रसंगी राजमुद्रा सघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन पाटील इंगोले, पंकज गायकवाड़ सदाशिव पा जाधव अशोक आण्णा बचेवार गिरिधर पा केरुरकर नरेश पा इंगोले रवि पा सिरसे रोहित भोसले बालाजी पा बोडके रामदास पाटिल , श्रीकांत इंगोले सचिन चव्हाण विठ्ठल जमदार, गंगाधर घाळेवार , मनोज पा इंगोले, गजानन साखरे, बालाजी पाटील इंगोले, राजु स्वामी यांची उपस्थिती होती. आयोजक राजमुद्रा सामाजिक संघटना मुखेड

# ब्लू फलॅग'साठी नागाव बीच सज्ज; वनमंत्री गणेश नाईक यांच्या पुढाकाराला यशाचे गारुड

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पर्यावरणपूरक पर्यटनाच्या दिशेने ऐतिहासिक टप्पा महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या पुढाकारामुळे अलिबाग तालुक्यातील 'नागाव बीच'च्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील ओळखीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. माथेरान येथे नुकत्याच पार पडलेल्या नुतन वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी एक ऐतिहासिक घडामोड घडली नागाव ग्रामपंचायत व महाराष्ट्र राज्य वनविभाग यांच्यात "ब्लू फलॅग" प्रमाणपत्रासाठी सामंजस्य करार झाला.या महत्त्वपूर्ण करारामुळे नागाव समुद्रकिनाऱ्याला जागतिक दर्जा प्राप्त करण्याची संधी चालून आली असून, तो महाराष्ट्रातील पहिला आणि देशातील 14 वा "ब्लू फलॅग" मानांकन मिळवणारा किनारा ठरण्याची शक्यता आहे. पर्यटनाचे नवे दालन खुले करणारा करार"हा उपक्रम महाराष्ट्राच्या इको-पर्यटन धोरणाशी सुसंगत असून, राज्याच्या पर्यटनाला जागतिक व्यासपीठ मिळवून देणारा आहे," असे उद्गार वनमंत्री गणेश नाईक यांनी या प्रसंगी काढले. त्यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत स्थानिक स्वराज्य संस्थांशी सुसंवाद साधत पर्यावरणपूरक विकासासाठी




वनविभागने घेतलेल्या पावलांचे अभिनंदन केले.स्थानिकांसाठी रोजगार आणि नैसर्गिक संवर्धनाचा संगम नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी नमूद केले की, "या करारामुळे नागावचा झपाट्याने विकास होईल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील, आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी पाऊले उचलली जातील."राहूल पाटील यांचे योगदान लक्षणीय या कराराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उपवनसंरक्षक राहूल पाटील यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. कराराअंतर्गत स्वच्छता, जैवविविधता संवर्धन, सुरक्षितता, सांडपाणी व्यवस्थापन, तसेच पर्यटन सुविधा उभारणी यावर विशेष भर दिला जाणार आहे.
एक पाऊल पुढे , हरित भविष्याकडे वनमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या किनारी भागातील पर्यटनाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. नागाव बीचचे "ब्लू फलॅग"साठीचे प्रवास हे केवळ एक प्रमाणपत्र मिळवण्याचे उद्दिष्ट नसून, महाराष्ट्राला हरित, स्वच्छ आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून उभे करण्याचा संकल्प आहे.
ही बातमी महाराष्ट्राच्या पर्यावरण आणि पर्यटन क्षेत्रातील नवीन युगाची नांदी ठरणार आहे.

# मतदान केंद्रापर्यंत मोबाईल नेता येणार ; मतदारांनी केले निवडणूक आयोगाचे निर्णयाचे स्वागत.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

मतदारांच्या सोयीसाठी आणि मतदान दिवशीच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेर मोबाईल ठेवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्व पूर्ण निर्णय घेतला आहे. प्रचारासाठीची मर्यादा देखील नव्याने निश्चित करण्यात आली असल्याचे जाहीर केले आहे. हे निर्णय लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ आणि निवडणूक आचारसंहिता, १९६१ यांच्याशी सुसंगत आहेत.ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये मोबाईल फोनचा वाढता वापर लक्षात घेता, तसेच वृद्ध, महिला आणि दिव्यांग मतदारांना येणाऱ्या अडचणींचा विचार करता, आयोगाने मतदान केंद्राच्या बाहेरच मोबाईल ठेवण्याची सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे. तर मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत केवळ बंद अवस्थेतील मोबाईल्स नेण्यास परवानगी राहणार आहे, प्रवेशद्वाराजवळ मोबाईल सुरक्षित ठेवण्याची सुविधा मतदाराला दिली जाणार आहे , मतदारांना मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास परवानगी दिली जाणार नाही. मात्र, काही ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी याला अपवाद देऊ शकतात. मतदान गुप्ततेचा नियम (नियम ४९ एम) यापुढेही काटेकोरपणे पाळला जाणार आहे.प्रचाराच्या संदर्भातही महत्त्वाचा बदल करण्यात आला असून, मतदान केंद्राच्या १०० मीटर अंतराच्या आत प्रचारास मनाई करण्यात आली आहे. मतदान दिवशी उमेदवारांनी मतदारांसाठी अनौपचारिक ओळखपत्र (VIS नसल्यास) देण्यासाठी ठेवलेले मदत बूथ हे आता मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या पलीकडेच ठेवावे लागणार आहेत. भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, डॉ.सुखबीर सिंग संधू आणि डॉ.विवेक जोशी यांच्या नेतृत्वाखाली, भारत निवडणूक आयोग मतदान प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत पार पाडण्याबरोबरच मतदारांसाठी सुविधा सुधारण्या साठी सातत्याने नवकल्पना राबवत असल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे."



## सिद्धेश्वर ना. पतसंस्थेत सहकार महर्षी माजी मंत्री कै.माणिकराव पालोदकर यांची २३ वी पुण्यतिथी साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** : – सिद्धेश्वर नागरी सहकारी पतसंस्था सिल्लोड येथे सहकार महर्षी माजी मंत्री कै. माणिकराव ( दादासाहेब) पालोदकर यांची २३ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.व कै. दादासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे चेअरमन रामदास पालोदकर, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे चेअरमन अब्दुल समीर, संस्थेचे संचालक दादाराव पंडित, राजकुमार कटारिया, निलेश अवकाळे, सागर पालोदकर, वाणी सर, संजय साळवे, संजय फुलसौदर, शेख सलीम, रघुनाथ घरमोडे, विनोद काटकर तसेच संस्थेचे व्यवस्थापक भानुदास जंजाळ, कर्मचारी गणपत सोनवणे, किशोर पांडे, दत्ता पाईकराव आदींची उपस्थिती होती




## अर्चित चांडक यांनी अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला

### तर पोलीस अधीक्षक बच्चन सिंह जिल्ह्यात नेहमीच प्रयत्नशील राहिले, नागपूरला बदली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

अकोला जिल्ह्यातील पोलीस प्रशासनात महत्त्वाचा बदल झाला असून नव्याने नियुक्त झालेले पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांनी 23 मे. 2025 रोजी मावळते पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे, बच्चन सिंह यांची नुकतीच समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ४ नागपूरला बदली झाली आहे, त्यांच्या निरोप आणि नव्या अधिकाऱ्यांच्या स्वागतासाठी भव्य समारंभाचे आयोजन विजय हॉल अकोला येथे करण्यात आले होते, या समारंभास अकोला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी




पोलीस स्टेशन प्रमुख, शाखा प्रमुख तसेच अन्य मान्यवर अधिकारी उपस्थित होते, कार्यक्रमाची सुरुवात मावळते पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या स्वागताने झाली त्यांनी आपल्या मनोगतातून अकोल्यातील सहकार्य संघभावना आणि कार्यक्षम टीमच्या योगदानाबद्दल विशेष उल्लेख केला, यावेळी नूतन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी आपल्या मनोगतातून संघटनशक्ती, समन्वय आणि जबाबदारी या मूल्यावर भर देत अकोल्यातील कायदा आणि सुव्यवस्था अधिक सक्षमपणे हाताळण्याचा विश्वांस व्यक्त केला या करिता सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर सहकार्याने जबाबदारी पार पाडावी असे त्यांनी आवर्जून सांगितले,

## गांजाचे सेवन केल्याबद्दल पनवेल तालूका पोलिसांनी केली कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ):**

पनवेल तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये एक इसम गांजा हा अंमली पदार्थ सिगारेटच्या तंबाखूमध्ये मिक्स करून त्याचे सेवन करीत असताना आढळल्याने त्याच्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे. आकाश शिवाजी भगत हे पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हे प्रकटीकरण पथकात कार्यरत आहेत. यावेळी पनवेल तालुका पोलिस ठाणे हद्दीत अवैध कृत्यांवर कारवाई करण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या आदेशानुसार कुदळे, शिवाजी बाबर, आकाश भगत हे पनवेल तालुका पोलिस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना आजिवली, येथील जुना मुंबई-पुणे हायवे रोडच्या बाजूला हॉटेल मरीआईसमोर असलेल्या लोखंडी पाईपमध्ये एक इसम एका सिगारेटच्या तंबाखूमध्ये मिसळून सिगारेटमध्ये भरून जळत्या काडीने पेटवून त्याचे भुरके मारत असल्याचे दिसून आले. यावेळी त्यांची अधिक चौकशी केली असता त्याने त्याचे नाव गणेश मनोज चव्हाण असून झोमॅटोमध्ये डिलीव्हरी बॉय म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. त्याच्याविरुध्द गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधि. १९८५चे कलम ८ (क), २७अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

## कर्करोग निदान अत्याधुनिक व्हॅन


### कर्करोग तपासणी मोहिमेचा पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, वार्ताहर**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आवार येथे आज कर्करोग निदान अत्याधुनिक व्हॅन (फिरते रुग्णालय) चा फित कापून कर्करोग तपासणी मोहिमेचा शुभारंभ पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द आठल्ये, प्रांताधिकारी जीवन देसाई, राहूल पंडित, बंड्या साळवी, बिपीन बंदरकर आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री डॉ. सामंत यांनी कर्करोग निदान अत्याधुनिक व्हॅनची पाहणी केली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. जगताप यांनी व्हॅनबाबत पालकमंत्र्यांना माहिती दिली. जिल्ह्यामध्ये मे व जूनमध्ये प्रत्येक तालुक्यात गावभेटीतून व्हॅन मध्ये मुख, स्तन आणि गर्भाशय मुख कर्करोग तपासणी करून, कर्करोगाचे निदान केले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांपर्यंत महत्त्वपूर्ण तपासणी सेवा पोहोचवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामुळे वेळेवर निदानात सुधारणा होईल आणि संभाव्यतः अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होईल. ही व्हॅन सामान्य कर्करोगांच्या तपासणीसाठी सुसज्ज आहे, ज्यात सुरुवातीला डिजिटल मशीन वापरून स्तनाच्या तपासण्या आणि कॉल्पोस्कोप वापरून गर्भाशयाच्या मुखाच्या तपासण्या यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. तरी या संधीचा मोफत लाभ घेऊन नागरिकांनी मुख, स्तन आणि गर्भाशय मुख कर्करोगाची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालयाचा आढावा पालकमंत्री उदय सामंत यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाचा आढावा घेतला. यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुध्द आठल्ये, प्रांताधिकारी जीवन देसाई, तहसिलदार राजाराम म्हात्रे, कार्यकारी अभियंता अमोल ओटवणेकर आदी संबधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## संभाजी ब्रिगेडचे दबंग जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित...




**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

**रिसोड.:** तालुक्यातील ग्राम नेतंसा येथील छत्रपती संभाजी महाराज जयंती निमीत्त मराठा स्नेहसंवर्धक मंडळाच्या वतीने व रामतीर्थ संस्थानचे वतीने मराठा मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन १८ मे रोजी करण्यात आले होते. या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून केंद्रीय आयुष्य स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव होते. तर स्वागताध्यक्ष पदी डॉ. राम शिंदे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठा समाज भूषण डॉ. भूषण मापारी, उद्योजक देवेंद्र खडसे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, आ. अमित झनक, ज्योतीताई गणेशपुरे, रा. काँ. प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे, डॉ. गजानन बाजड, डॉ. अजय पाटील, वसंतराव धाडवे, प्राचार्य वसंतराव अवचार यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थित होते. विविध समाजातील सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांचा व नागरिकांचा मान्यवरांच्या हस्ते शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अर्जुन पाटील खरात हे गेल्या 25 वर्षापासून पत्रकारिता तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून अखंड समाजसेवा करीत असल्याबद्दल त्यांना केंद्रीय आयुष्य स्वतंत्र प्रभार तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते '' मराठा समाज भूषण '' पुरस्कार देण्यात आला.यामधे शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन विनोद बोरे तर आभार दिनकर बोडखे यांनी मानले.अर्जुन पाटील खरात यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.


## घाटंजीतील घाटी येथे नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### श्री संत शिरोमणी भीमाभोई जयंती महोत्सव निमित्त आयोजन; शेकडो नागरिकांनी घेतला लाभ

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

(घाटंजी) घाटी, श्री संत शिरोमणी भीमाभोई जयंती महोत्सवाचे औचित्य साधून, महाराष्ट्र प्रदेश भोई समाज संघटना आणि महेश पवार मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने घाटी (घाटंजी) येथे एका भव्य नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, ज्यामुळे हे शिबिर यशस्वी ठरले. या शिबिरामध्ये शेकडो नागरिकांनी आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली. शिबिरासाठी प्रसिद्ध नेत्रचिकित्सक डॉ. विलास मुन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी शिबिरार्थींच्या डोळ्यांची तपासणी करून त्यांना योग्य मार्गदर्शन आणि उपचार सुचवले. त्यांच्या या सहकार्याबद्दल आयोजकांनी विशेष आभार व्यक्त केले. महाराष्ट्र प्रदेश भोई समाज संघटना आणि महेश पवार मित्र मंडळ यांनी आयोजित केलेल्या या जनोपयोगी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशा प्रकारच्या आरोग्य शिबिरांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या घराच्या जवळच उत्तम आरोग्य सेवा मिळण्यास मदत होते, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. भविष्यातही असे उपक्रम राबवण्याची मागणी यावेळी नागरिकांनी केली.

नेत्र तपासणी शिबीर घाटी घाटंजी









## राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धा परीक्षा 2025 चा निकाल जाहीर

### प्रथम अंकित लोंदासे, द्वितीय दुर्गेश लोंदासे, तृतीय सुमेध खोपे

### पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आली होती सर्व सामान्य ज्ञान स्पर्धा

**.दैनिक युवक आधार**
**भंडारा- वार्ताहर**

प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझ्या मराठवाडा संपादक संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त 18 मे 2025 ला स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती या परीक्षेचा निकाल 25 मे 2025 ला सकाळी 7 वाजता जाहीर करण्यात येणार असून संपूर्ण विद्यार्थ्यांची यादी ओ .एस .एस. कम्प्युटर अड्याळ व सनराइज कॉम्प्युटर पहेला येथील नोटीस बोर्डावर पाहायला मिळेल.या परीक्षेला एकूण 170 विद्यार्थ्यांनी परीक्षेकरिता नोंद केली होती. परंतु प्रत्यक्षात 147 विद्यार्थ्यांनी सामान्य ज्ञान परीक्षा दिली .या परीक्षेत अंकित वसंता लोंदासे 77 टक्के गुण




घेऊन प्रथम आलेला आहे . दुर्गेश विनोद लोंदासे यांनी 72 टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटविला. तर सुमेध खुशाल खोपे यांनी 69 टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान मिळविला. ही परीक्षा अड्याळ व पहेला या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. परीक्षा यशस्वी करण्याकरता ओ .एस. एस. कम्प्युटरचे संचालक संजय वंजारीअड्याळ ,सनराईज कम्प्युटरचे संचालक विलास बांडेबुचे पहेला, संयोजक पंकज वानखेडे,प्राध्यापक संजना संजीव भांबोरे, कुलदीप गंधे, चेतन रामटेके ,रोशन खानोरकर ,फिनिक्स करिअर अकॅडमी चे शिक्षक यांनी सहकार्य केले. प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला 1001, सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र पुष्पगुच्छ, द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्याला 701,सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र ,पुष्पच्छ ,त्याचप्रमाणे तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्याला 50 1,सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ देऊन दुपारी 3 वाजता 9 जून 2025 ला शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे निसर्ग रम्य ठिकाण असलेल्या दोन एकर मध्येअसलेल्या ठिकाणी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस देण्यात येणार आहे .करिता प्रथम, द्वितीय ,तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम स्थळी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा संपादक पत्रकार संजीव भांबोरे यांनी केलेले आहे. त्याचप्रमाणे सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या इन्स्टिट्यूट मध्ये सन्मानपत्र देण्यात येतील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## इसम बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



उमेशसिंग गयासिंग ठाकूर

तळोजा एमआयडीसी येथे काम करत असलेल्या ठिकाणावरून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे . उमेशसिंग गयासिंग ठाकूर ( ५५ ) असे या इसमाचे नाव असून रंग गोरा ,उंची ५. ५ इंच , अंगाने सडपातळ ,केस काळे सफेद बारीक ,नाक सरळ ,डोळे काळे ,चेहरा लांबट ,मिशी जाड असून अंगात चॉकलेटी फुल शर्ट ,काळ्या रंगाची फुल पँट व काळ्या रंगाचे शूज घातले आहेत . त्याला हिंदी ,बिहारी भाषा अवगत आहे . या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने तळोजा पोलीस ठाणे ०२२-२७४१२३३३ किंवा पो. ना. सूर्यकांत शिंदे मो. नंबर ९०८२३८७३१४ येथे संपर्क साधावा .


## सॅनहोजे - कॅलिफोर्नियामधील दुसऱ्या नाफा मराठी चित्रपट महोत्सवाची घोषणा!

### २५ -२७ -२८ जुलैला होणार चित्रपट महोत्सव !

### अमेरिकेत मराठी चित्रपटसृष्टीउभारण्याचे स्वप्न !

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

**प्रतिनिधी** : 'देऊळ' आणि 'भारतीय' या चित्रपटांचे निर्माते, सुवर्ण-कमळ राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित अभिजीत घोलप यांच्या संकल्पनेतून 'नॉर्थ अमेरिकन मराठी फिल्म असोशिएशन'ची (नाफा) स्थापना गेल्यावर्षी करण्यात आली होती. मराठी चित्रपट, कला संस्कृतीच्या माध्यमातून दर वर्षी अमेरिकेत मराठी चित्रपटांचा भव्य सोहळा सॅन होजे येथे आयोजित करण्यात येतो. गेल्यावर्षी प्रथम म्हणजे २०२४ च्या २७ आणि २८ जुलै रोजी हा सोहळा कॅलिफोर्नियामध्ये अमेरिका, कॅनडा मध्ये स्थायिक असलेल्या भारतीयांच्या उपस्थितीत पहिला भव्यदिव्य महोत्सव संपन्न झाला होता. यावर्षी २५, २६ आणि २७ जुलै २०२५ ला दुसरा नाफा महोत्सव हॉलिवूडच्या धर्तीवर सॅन होजे येथे संपन्न होणार असल्याची घोषणा नाफाचे संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप यांनी नुकतीच प्रसिद्धीपत्रकाद्वारे मुंबईत केली. उत्तर अमेरिकेत आणि कॅनडामध्ये वास्तव्यास असणाऱ्या जवळपास साडेपाच लाख मराठी,




भारतीयांपर्यंत मराठी चित्रपट पोहचविण्याची धडपड अभिजित घोलप 'नाफा'च्या माध्यमातून करीत आहेत. दर महिन्याला १ मराठी चित्रपट 'उत्तर अमेरिका - कॅनडा'मध्ये २०२४ पासून प्रदर्शित होत आहेत. 'गुलकंद', 'सुजित सुशीला', 'संगीत मानापमान', 'चिकीचीकी बुबुम्बुम', 'पाणी', 'गुलाबी', 'नवरा माझा नवसाचा २', 'अशी ही जमवा जमावी', 'स्थळ', 'सलतात रेशीम गाठी' इत्यादी चित्रपट आतापर्यंत अमेरिकेत आणि कॅनडामध्ये नाफाद्वारे रितसर चित्रपटगृहांमध्ये महाराष्ट्रातील प्रदर्शनाच्याच दिवशी तिथे प्रदर्शित झाले असून अमेरिकेत या सर्व चित्रपटांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्रातील मातब्बर निर्मिती व वितरण संस्थांसोबत नाफाने करार केले आहेत. अमेरिकेत हॉलिवूडच्या धर्तीवर मराठी चित्रपटसृष्टी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवून अभिजित घोलप नाफाची कार्यप्रणाली विकसित करीत असून तेथील अनेक तरुण कलावंत, प्रेक्षक जोडले जात असल्याचे घोलप सांगतात. ते म्हणाले. "'देऊळ' या माझ्या चित्रपटाला राष्ट्रीय सुवर्ण-कमळ पुरस्कार मिळाल्यानंतर नॉर्थ अमेरिकेत मराठी चित्रपटसृष्टी स्थापन करावी असा विचार मनात होता. माझ्या या विचाराशी सहमत असलेले ५००हून अधिक सदस्य अल्पावधीतच या कामाशी जोडले गेले. वर्षाअखेरीस दोन लघुपटाची निर्मिती करण्याचं ध्येय ठेवून 'फिल्म क्लब'च्या तयारीला लागलो. अनेक कलावंत, दिग्दर्शक, नृत्यदिग्दर्शक, गायक,



कवी, सिनेमॅटोग्राफर्स, संकलक यांनी फिल्म क्लबमध्ये नोंदणी केली. त्यासाठी दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांची कार्यशाळा आयोजित केली. याशिवाय टॉक शोज, डॉ. मोहन आगाशे, दिलीप प्रभावळकर, डॉ. सलील कुलकर्णी, सचिन खेडेकर, समीर चौघुले, अभिजीत देशपांडे यांच्या कार्यशाळा, चर्चासत्रांच्या माध्यमातून कार्यविस्तार होत आहे., विविध क्षेत्रात आघाडी घेतल्यानंतर अमेरिकेतल्या भारतीयांना मनोरंजनक्षेत्रात आपली कला दाखवण्याची संधी मिळणार आहे. गेल्यावर्षीच नाफाने या दिशेने पहिले पाऊल टाकले असून,अमेरिकेत सातासमुद्रापार मराठी चित्रपटसृष्टी उभारणीचं स्वप्न सत्यात उतरण्यास सुरुवात झाली आहे. आपल्या सर्व कलावंत आणि तंत्रज्ञाच्या साथीने लवकरच ते पूर्णत्वास जाईल." 'नाफा २०२४' महोत्सवामध्ये जेष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर, सचिन पिळगांवकर, सुप्रिया पिळगांवकर, निवेदिता सराफ, महेश मांजरेकर, सुबोध भावे, दिग्दर्शक जब्बार पटेल, उमेश कुलकर्णी, डॉ. सलील कुलकर्णी, प्रसाद ओक, मृणाल कुलकर्णी, मेधा मांजरेकर इत्यादींची उपस्थिती लाभली होती. यावर्षी NAFA फिल्म फेस्टिव्हल २५, २६, २७ जुलै २०२५ रोजी, कॅलिफोर्नियातील सॅन होजे येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवात डॉ. मोहन आगाशे, अमोल पालेकर, सचिन खेडेकर, महेश कोठारे, अश्विनी भावे, सोनाली कुलकर्णी (ज्येष्ठ), अवधूत गुप्ते, आदिनाथ कोठारे, वैदेही परशुरामी आणि मधुर भांडारकर या प्रमुख सेलिब्रिटींची उपस्थिती असणार आहे. नाफा महोत्सवासाठी अमेरिकेतील 'बीएमएम'च्या ५७ महाराष्ट्र मंडळांचे सहकार्य लाभले आहे.

## पावसाबरोबरच अंधाराचे संकट .विजेचा लपंडाव नागरिक वैतागले.!! - धनंजय मुसळे.

**दैनिक युवक आधार**
**वाशिम उपजिल्हा प्रतिनिधी**
**गजानन पवार पाटील.**



मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावल्यानंतर वाशिम जिल्ह्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना वाढल्या आहेत.गेल्या पाच दिवसांपासून नागरिकांना विजेच्या लपंडावाचा सामना करावा लागत असून यामुळे दैनदिन जीवन विस्कळीत झाले आहे रविवारी रात्री झालेल्या पावसामुळेअनेक भागाचा वीज पुरवठा पूर्ण पणे खंडित झाला काही भागात विजेचा अचानक लपंडाव होत असून काही ठिकाणी वेळोवेळी वीज गायब होण्याच्या घटना सातत्याने घडत आहे.या अनियमित वीज पुरवठ्यामुळे विद्यार्थी व्यापारी ग्रहीनी आणि शेतकरी सर्व वर्ग त्रस्त झाला आहे.महावितरण कंपनी कडून कोणतीही पूर्व सूचना न देता वीज खंडित केली जातअसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. विषेस !त रात्रीच्या वेळी वीज नसल्यानं उष्णता आणि किटकामुळे त्रास अधिक जाणवत आहे.या परिस्थितीवर तातडीने उपाय योजना करून नागरिकांना स्थिर आणि विश्वासार्ह वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा.अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.दरम्यान पुढील काही दिवस पावसाचं जोर कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली असून खबरदारी घेणे आवश्यक आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# भूस्खलनाचा वाढता धोका!

## विक्रोळी, भांडुप, पवईतील नागरिकांसाठी इशारा


**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या एस विभागातील विक्रोळी, भांडुप आणि पवई येथील उंच उतार आणि सैल माती असलेल्या भागाला मुंबई उपनगर जिल्हाधिकारी विभागाने भूस्खलनाचा इशारा दिला आहे. या विभागात सरासरी पेक्षा अधिक पाऊस पडतो. तसेच हे क्षेत्र भूकंपीय क्षेत्र ३ (मध्यम भूकंप प्रवण प्रदेश) अंतर्गत येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मुंबई महापालिकेच्या एस विभागात भूस्खलनामुळे होणारी घटना टाळण्यासाठी किंवा जीवितहानी रोखण्यासाठी म्हाडाने भारताचे भूगर्भीय सर्वेक्षणामार्फत नोदविलेल्या १३ संवेदनशील ठिकाणी संरक्षक भिंती बांधल्या आहेत. तसेच एस विभागातील सूर्यनगर, विक्रोळी (प.), इंदिरा नागा, पवई, हनुमान नगर, भांडुप (प.), नादर चाळ, भांडुप (प.), खिंडीपाडा, भांडुप (प.), तुलशेत-पाडा, भांडुप (प.), खिंडीपाडा, भांडुप (प.), या ७ ठिकाणी भूस्खलन टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत तसेच मुंबई महापालिकेच्या एस विभागाच्या वतीने सुरक्षित ठिकाणी किंवा महापालिकेच्या तात्पुरत्या निवाऱ्यामध्ये स्थलांतरित होण्याचे आवाहन केले आहे. यासाठी पालिकेच्यावतीने विक्रोळी (प.) आणि भांडुप (प.) या डोंगराळ झोपडपट्टी भागात माहितीपूर्ण बॅनर आणि फ्लेक्स नागरिकांच्या माहितीसाठी लावले आहेत.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शुक्रवारी विक्रोळी येथील सूर्यानगर या दरड प्रवण क्षेत्राला भेट देऊन येथे संरक्षक जाळी बसवण्याचे निर्देश दिले होते. दरवर्षी याठिकाणी दुर्घटना घडत असल्याने स्थानिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे, असे संबंधित अधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले होते. शिंदे यांनी भांडुप येथील उषानगर, उषा कॉम्प्लेक्स, नेहरूनगर नाला वडाळा, दादर येथील नालेसफाईची पाहणी केली.

### 'एस' विभागाने तात्पुरत्या निवारागृहांची सोय केलेली ठिकाणे

- टेंभीपाडा महानगरपालिका शाळा, भांडुप (प.)
- तिरंदाज मराठी प्राथमिक शाळा, पवई
- पासपोली मराठी प्राथमिक शाळा, पवई
- भांडुप महानगरपालिका शाळा, भांडुप
- कन्नमवार नगर महानगरपालिका शाळा, विक्रोळी (प.)
- टागोर नगर महानगरपालिका शाळा, विक्रोळी (प.)
- एमव्हीआर शिंदे मार्ग पालिका शाळा, भांडुप (प.)
- वर्षा नगर एमपीएस शाळा, विक्रोळी (प.).
- नेहरू नगर एमपीएस शाळा, कांजूरमार्ग (प.).
- तुलशेत पाडा महानगरपालिका शाळा, भांडुप (प.).


**विक्रोळी पार्कसाइट टेकडीवरील झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित होण्याचे आवाहन मुंबई पालिकेने केले आहे. (छायाचित्र : सलमान अन्सारी)**

# शिस्तभंग म्हणून ग्रॅच्युइटी, पीएफ रोखता येणार नाही

- निवृत्तीनंतर कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई नाही – मुंबई उच्च न्यायालय
- महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलने महिला कर्मचाऱ्यांना दिलेली शिक्षा रद्द

**मुंबई :** निवृत्तीनंतर कर्मचाऱ्यावर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करता येणार नाही, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. पेन्शनसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांचे ग्रॅच्युइटी आणि भविष्य निर्वाह निधी (पीएफ) लाभ शिस्तभंगाच्या कारवाईच्या नावाखाली रोखता येणार नाहीत, असेही न्या. संदीप मारणे यांनी महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलच्या एका प्रकरणाशी संबंधित याचिकेवर सुनावणी करताना स्पष्ट केले.

महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलने दोन महिला कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून त्यांना कामावरून काढून टाकण्यात आले.


तसेच त्यांची ग्रॅच्युइटी आणि भविष्य निर्वाह निधी रोखला. महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलच्या या कारवाईला आव्हान देत शामला हर्डीकर आणि माधवी शिंदे या दोन्ही महिला कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. याचिकेवर न्यायमूर्ती मारणे यांच्यासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने दखल घेतली. निवृत्तीनंतर पेन्शनसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची कायद्यात तरतूद नसल्याचे न्या. मारणे यांनी स्पष्ट करत दोन्ही याचिकाकर्त्या महिलांना दिलासा दिला.

याचिकाकर्त्या महिलांच्या वारसांना ग्रॅच्युइटी आणि भविष्य निर्वाह निधीसह निवृत्तीलाभ देण्यात यावेत, शिस्तभंगाच्या नावाखाली संबंधित लाभ रोखता येणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

### नेमके प्रकरण काय?

शामला हर्डीकर ३१ मार्च २०११ रोजी निवृत्त झाल्या आणि माधवी शिंदे ३१ मे २०१० रोजी निवृत्त झाल्या. त्यांच्याविरुद्ध तक्रारींची चौकशी करताना ५ फेब्रुवारी २०१३ रोजी त्यांना कामावरून काढून टाकण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र होमिओपॅथी कौन्सिलने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली. सेवेत असताना सुरू केलेली शिस्तभंगाची कारवाई निवृत्तीनंतरही सुरू ठेवता येते का आणि शिक्षा देता येते का, याची सुनावणी न्यायालयाने घेतली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने कौन्सिलची कारवाई बेकायदेशीर ठरवून ती रद्द केली.

# किरकोळ भांडणात विद्यार्थिनीला जामीन मंजूर



**मुंबई :** खोलीचा दरवाजा उघडा ठेवण्यावरून झालेल्या भांडणात रूममेटला भाजल्याचा आरोप असलेल्या विद्यार्थिनीला उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. अर्जदार विद्यार्थिनी लॉ शिकत आहे. तिने रूममेट तरुणीला भाजल्याने झालेल्या जखमा गंभीर असल्याचे वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित झालेले नाही, असे निरीक्षण न्या. श्याम चांडक यांनी नोंदवले आणि आरोपी विद्यार्थिनीला जामीन मंजूर करीत मोठा दिलासा दिला.

पुण्यात भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या दोन तरुणींमध्ये वाद झाला होता. त्या वादातून कथित घटना २५ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २.५० वाजताच्या सुमारास घडली होती. पुणे सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर करण्यास नकार दिल्याने लॉच्या विद्यार्थिनीने ॲड. कुणाल पाटील, ॲड. प्रशांत राऊळ आणि ॲड. प्रसाद निकम यांच्यामार्फत उच्च न्यायालयात दाद मागितली होती. तिच्या अर्जावर न्या. श्याम चांडक यांच्यापुढे सुनावणी झाली. घटनेचा तपास पूर्ण होण्याच्या मार्गावर असल्याचे यावेळी न्यायालयाला सांगण्यात आले. त्यावर न्या. चांडक यांनी कथित घटना आणि सरकारी पक्षाने केलेल्या आरोपांच्या आधारे नेमकी वस्तुस्थिती गांभीर्याने तपासून अर्जदार विद्यार्थिनीला ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. कथित घटना क्षुल्लक कारणावरून घडल्याचे दिसून येते.

अर्जदार तरुणी लॉची विद्यार्थिनी असून तिचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. अशा स्थितीत तिला ताब्यात घेऊन चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असे न्यायालयाने अर्ज मंजूर केला.

# कृषी यांत्रिकीकरण योजनेची अंमलबजावणी

## राज्य सरकार ४०० कोटी रुपये खर्च करणार

**मुंबई :** शेतकऱ्यांना कृषी अवजारे यंत्र खरेदीसाठी कृषी यांत्रिकीकरण योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी ४०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना राबवण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. यासाठी कृषी यांत्रिकीकरण योजना अंमलात आणली आहे.

शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात असलेला निधी राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना वितरीत होईल याची दक्षता घेण्यात यावी. या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीबाबतची सोडत महाडीबीटी पोर्टलवरून विहीत कार्य पद्धतीचा अवलंब करुन काढण्यात यावी. तसेच, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना महा-डीबीटी प्रणालीद्वारे आधारसंलग्न बँक खात्यावर सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे जमा करावी, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### काय आहे योजना?

२०२५-२६ या वर्षात राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ४०० कोटी रुपयांच्या खर्चास शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेंतर्गत ट्रॅक्टर यासाठी अनुसूचित जाती / जमाती, महिला, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांसाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा १.२५ लाख यापैकी कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यांसाठी किंमतीच्या ४० टक्के किंवा १ लाख यापैकी कमी असेल ते या प्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीचा हात

**मुंबई :** शेतकरी आत्महत्या प्रकरणातील संबंधित मृत शेतकऱ्याच्या वारसाला वेळीच मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडून २० कोटीचा निधी सर्व विभागीय आयुक्तांना उपलब्ध करून दिला आहे.

विभागीय आयुक्तांचा पंचनामा अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासकीय नियमानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, असे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले. मदत करण्यासाठी विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी, कोकण यांना १२ लाख, पुणे - १ कोटी ६ लाख, नाशिक - ३ कोटी ३९ लाख, छत्रपती संभाजीनगर - ४ कोटी ९२ लाख, अमरावती - ६ कोटी ७६ लाख आणि नागपूर विभागीय आयुक्त यांना ३ कोटी ७५ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. शासनाने उपलब्ध करून दिलेला हा २० कोटींचा निधी मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळता राज्यातील उर्वरीत जिल्हाधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांमार्फत वितरीत करण्यात येणार आहे.

# देवनार डंपिंग साफ करण्यासाठी २१ कंपन्या इच्छुक!

**मुंबई :** देवनार डंपिंग मधील साचलेला कचरा साफ करण्यासाठी मुंबई महापालिकेने निविदा मागवल्या होत्या. या निविदेला २१ कंपन्यांनी रस दाखवला आहे. पालिकेने बोलवलेल्या पूर्वबोली बैठकीला २१ कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

राज्य सरकारने देवनार कचराभूमीची जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पाला देण्यासाठी या जागेत अनेक वर्षांपासून साचलेले कचऱ्याचे डोंगर हटवून जमीन रिकामी करण्याचे आदेश मुंबई महापालिकेला दिले आहेत. हा जुना कचरा हटवण्यासाठी मुंबई महापालिकेने गेल्या आठवड्यात निविदा मागवल्या होत्या. या कचराभूमीवर एकूण १८५ लाख मेट्रीक कचऱ्याचे ४० मीटर उंचीचे डोंगर असून हा कचरा हटवण्यासाठी सुमारे २,३६८ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तसेच या कामासाठी किमान तीन वर्षे लागणार आहेत. निविदा भरण्यापूर्वीची पूर्वबोली बैठक पालिका मुख्यालयात शुक्रवारी पार पडली. या बैठकीला २१ कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावी परिसराच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संपूर्ण मुंबईतील विविध ठिकाणच्या जागांची मागणी केली आहे. या प्रकल्पातील अपात्र रहिवाशांना सामावून घेण्यासाठी मुंबईत विविध ठिकाणची जमीन सरकार ताब्यात घेत आहे. देवनार कचराभूमीची १२४.३ एकर जागाही या प्रकल्पासाठी देण्याचा निर्णय सहा महिन्यांपूर्वी झाला आहे. मात्र देवनार कचराभूमीवर गेल्या शंभर वर्षांपासून जुना कचरा साठला आहे. कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करून जमीन रिकामी करून देण्याची मागणी धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरणाने केली आहे.



# शिंदे यांची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयाला भेट

**मुंबई :** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई कार्यालयात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी भेट दिली.

यावेळी त्यांनी कार्यालयात जनतेच्या तक्रार निवारणासाठीच्या 'जनता दरबाराचे' व विश्वेश्वरैया अभियंता वास्तु विशारद परिषद कक्षाचे उद्‌घाटन केले.

या प्रसंगी शिंदे यांच्या हस्ते प्रकल्पबाधित सदनिकाधारकांना चावी, वारस पत्र, पती-पत्नीच्या संयुक्त नावाची नोंद असलेल्या परिशिष्ट दोनच्या प्रमाणात प्रती वितरीत केल्या.

मुख्यमंत्री सुधारणा कार्यक्रम आयोजित क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांसाठी ७ कलमी कृती आराखडा अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई कार्यालयाने पटकाविलेल्या पहिल्या क्रमांकाबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांचे कौतुक केले. यावेळी आमदार दिलीप लांडे, प्राधिकरणाचे कर्मचारी, अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बृहन्मुंबई कार्यालयाला नुकतीच भेट होती. प्राधिकरणाच्या कार्यक्षमतेबद्दल त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांचे कौतुक केले होते.

# अत्राम यांचे 'एकला चलो रे'!

**मुंबई :** अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते धर्मरावबाबा अत्राम यांनी भाजपवर निशाणा साधत 'एकला चलो रे'ची भूमिका जाहीर केली आहे. नागपूर येथे राष्ट्रवादीच्या मेळाव्यात त्यांनी नाराजी व्यक्त केली.

अत्राम यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीत माझ्या विरोधात षडयंत्र रचले गेले. माझ्या विरोधात निवडणुकीत उभ्या असलेल्या उमेदवाराला भाजप आणि काँग्रेसकडून पैसे पुरवले गेले. तरीही मी विजयी झालो. स्थानिक स्वराज्य स्थंस्थेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीत दुसऱ्या पक्षाकडे जागेची भीक मागायची नाही. कोणाच्या कुबड्या घेऊन चालायचे नाही. गडचिरोली जिल्ह्यात कोणतीही तडजोड करणार नाही. मी कोणाचेही ऐकणार नाही. पक्ष आमच्यासोबत असेल, गडचिरोलीत स्वबळावर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सत्ता आणली जाईल, अशी भूमिका धर्मराव बाबा आत्राम यांनी मांडली, असेही ते म्हणाले.

# छगन भुजबळांनी कार्यभार स्वीकारला

## अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कार्यालय दुसऱ्या मजल्यावर

**मुंबई :** अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाची जबाबदारी भुजबळ यांच्यावर सोपवण्यात आली असून मंत्रालयातील विस्तारीत इमारतीत दुसऱ्या मजल्यावर त्यांचे कार्यालय असणार आहे.



२० मे रोजी मंत्रिपदाची शपथ घेण्याच्या आठ दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर चर्चा झाल्याचे स्वतः भुजबळ यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले. त्यामुळे भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात मुख्यमंत्र्यांचा खारीचा वाटा, अशी राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी मंत्रालयात कार्यभार स्वीकारत २५ लक्ष नवीन लाभार्थ्यांचे समावेशन, स्मार्ट शिधापत्रिका, रास्त भाव दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे, वजन मापे पडताळणी व मुद्रांकनाची सेवा, मुख्यमंत्र्यांच्या १०० आणि १५० दिवसांचा कार्यक्रम, ई गव्हर्नन्स, सेवाविषयक प्रशासकीय सुधारणा आदी विषयांचा प्रामुख्याने आढावा घेतला.

बैठकीमध्ये यांनी विभागाच्या कामकाजाबाबत माहिती घेऊन धान खरेदी वेळेत होऊन पावसाळी परिस्थिती लक्षात घेऊन योग्य धान साठवणूकीबाबतची आवश्यक ती उपाययोजना करावी. तसेच धानाचे नुकसान होणार नाही, याबाबत कार्यवाही करावी.

# विदर्भातील 'ती' कुटुंब बेघर होण्याचा धोका!

### काँग्रेस नेते नाना पटोले यांनी व्यक्त केली भीती

**मुंबई :** विदर्भातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगलाला वनक्षेत्र घोषित करून ८६ हजार हेक्टर क्षेत्र महसूल विभागाने वनविभागाला हस्तांतरित करण्यात येणार आहे. यामुळे या जमिनीला डिनोटीफाय करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला मोठा धक्का बसला आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे पूर्व विदर्भातील लाखो कुटुंब बेघर आणि भूमिहीन होण्याचा धोका असून या भागाच्या विकासाला खिळ बसणार आहे. राज्य सरकार सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यात कमी पडल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून सरकारने या प्रकरणात पुनर्विचार याचिका दाखल करावी अशी मागणी काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने १२ डिसेंबर १९९६ च्या निर्णयाच्या धर्तीवरच निकाल दिला आहे. त्यामुळे आता झुडपी जंगलाला वन भूमी घोषित केले असून ती वनविभागाचा हस्तांतरित करण्यात येणार आहे.

# तीन लाखांहून अधिक कंत्राटदार आक्रमक

**मुंबई :** ९० हजार कोटींची थकीत बिलाची रक्कम मिळावी यासाठी राज्य कंत्राटी महासंघाने ३ जूनपासून काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्या विविध विभागातील विकास कामे मार्गी लावणाऱ्या तीन लाखांहून अधिक कंत्राटदारांची बिलापोटी ९० हजार कोटींची रक्कम थकीत आहे.

## पनवेल-सोमाटणे, पनवेल-चिखली दरम्यान नवीन कॉर्ड लाइन प्रकल्प

# पनवेल कॉर्ड लाइन प्रस्तावाला मान्यता

## मध्य रेल्वे राबविणार ४४४.६४ कोटींचा प्रकल्प



**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशात रेल्वेची क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने रेल्वे मंत्रालयाने पनवेल-सोमाटणे आणि पनवेल-चिखली दरम्यान ७.५४ किमी लांबीच्या पनवेल कॉर्ड लाइन्स बांधण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. ४४४.६४ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प मध्य रेल्वेमार्फत राबविला जाणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतुकीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) विविध प्रकल्प राबवत आहे. प्रवाशांचा प्रवास गतिमान करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने पनवेल कॉर्ड लाइन्स बांधण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

या नवीन लिंकमुळे रेल्वेची क्षमता वाढेल आणि गर्दी कमी होईल. तसेच प्रवासी आणि मालवाहतूक गाड्यांची वाहतूक सुरळीत आणि जलद होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

पनवेल हे मुंबई उपनगरीय रेल्वेच्या हार्बर मार्गावरील एक महत्त्वाचे टर्मिनल आहे. ते उत्तरेकडे दिवा, दक्षिणेकडे रोहा, पश्चिमेकडे जेएनपीटी आणि पूर्वेकडे कर्जत असे अनेक दिशांना एक महत्त्वाचे जंक्शन म्हणून आहे. सध्या, ग्रेड-सेपरेटेड क्रॉसिंग नसल्यामुळे इंजिन रिव्हर्सल झाल्यामुळे परिचालनसाठी विलंब होतो.

- जेएनपीटी-कर्जत कॉरिडॉरवर दिवा-पनवेल लाइन फ्लायओव्हर मार्गे कॉर्ड लाइन
- काळदुंरीगाव केबिन आणि सोमटणे स्टेशन दरम्यान दुसरी कॉर्ड लाइन

# राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वे मार्गाला ४९४.१३ कोटी रुपये मंजूर

**मुंबई :** रेल्वे मंत्रालयाने राहुरी ते शनिशिंगणापूर यांना जोडणाऱ्या नवीन रेल्वे मार्गाच्या बांधकामाला मान्यता दिली आहे. हा रेल्वे मार्ग २१.८४ किमी लांबीचा असून यासाठी ४९४.१३ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

शनिशिंगणापूर हे राज्यातील प्रमुख धार्मिक स्थळ आहे. दररोज ३० ते ४५ हजार भाविक येथे दर्शनासाठी येतात. मात्र या ठिकाणी रेल्वे जोडणी नसल्याने भाविकांची येथे ये-जा करताना गैरसोय होते. भाविकांची गैरसोय दूर करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने राहुरी ते शनिशिंगणापूर दरम्यान नवीन रेल्वे मार्गाला मान्यता दिली आहे. या मार्गामुळे भाविकांना आध्यात्मिक केंद्रापर्यंत पोहचणे सोईस्कर होणार आहे. यासोबतच विशेषतः राहुरी आणि जवळील भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे. या मार्गामुळे शिर्डी, राहु-केतू मंदिर (राहुरी), मोहिनी राज मंदिर (नेवासा) आणि पैस खांब करवीरेश्वर मंदिर (नेवासा) यासारख्या इतर धार्मिक आणि पर्यटन स्थळांनाही फायदा होण्याबरोबरच स्थानिक पर्यटन आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची शक्यता आहे.

सविस्तर प्रकल्प अहवालात दररोज चार जोड्या प्रवासी गाड्यांचा प्रस्ताव आहे. यामध्ये भारतातील सर्वाधिक भेट दिलेल्या आध्यात्मिक केंद्रांपैकी एक असलेल्या या केंद्राकरिता ही पायाभूत सुविधा आणि दळणवळण सुधारण्यासाठी हा विकास एक महत्त्वाचा टप्पा असणार आहे.